रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २०७
www.ramprahar.com
◆ शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

महिला उद्योजकांसाठी पर्यटन विभागाची आई योजना/२
गांधारी नदीवरील पुल बांधकामात अंतर्गत चुका/५
लोकसहभागातून घडणार आरोग्यदायी महाराष्ट्र/७

### छत्रपती शिवरायांच्या १२ किल्ल्यांसाठी 'युनेस्को'कडून प्रमाणपत्र



**पॅरिस** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना 'युनेस्को'ने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदर्भातील 'युनेस्को'चे अधिकृत प्रमाणपत्र गुरुवारी (दि.१२) राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी युनोस्कोच्या फ्रान्समधील कार्यालयात जाऊन स्वीकारले. ११ जुलै २०२५ रोजी, युनेस्कोच्या ४७व्या अधिवेशनात, 'मराठा मिलिटरी लॅंडस्केप्स ऑफ इंडिया' या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील १२ किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले. या मानांकनाचे अधिकृत प्रमाणपत्र ॲड. शेलार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ पॅरिस येथे स्वीकारले. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी असा १२ किल्ल्यांचा समूह आज जागतिक वारसा स्थळ म्हणून संपूर्ण जगासमोर उभा राहिला आहे.

# स्वयंसेवी संस्थांमुळे महाराष्ट्रातील परिवर्तनाला वेग -मुख्यमंत्री फडणवीस

## राज्य सरकारचे टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशनसोबत विविध करार



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विविध क्षेत्रांसह देशाच्या प्रगतीमध्ये वेगळा ठसा उमटवीत आहे. राज्याच्या प्रगतीचा वेग असाच कायम ठेवून राज्य शासनाच्या विविध स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे वेगाने परिवर्तन होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत करण्यात आलेल्या करारावेळी व्यक्त केला. टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत झालेल्या करारामुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास संपूर्ण महाराष्ट्रभर पोहचविणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी या वेळी सांगितले.

या वेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर – साकोरे उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक कुटुंबासाठी आरोग्य, पोषण, पाणी सुरक्षा आणि उपजीविका सुधारणे याला शासनाचे प्राधान्य आहे. **(पान २ वर..)**

## स्कूल बसला अपघात; विद्यार्थी जखमी

**पनवेल : वार्ताहर**

भरधाव टेम्पोने समोरून स्कूल बसला धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोन शालेय विद्यार्थी जखमी झाल्याची घटना पनवेल जवळील पुणे–मुंबई हायवेवर पारपुंड गावाजवळील वेलकम हॉटेलच्या समोरील रस्त्यावर घडली आहे.

स्कूल बस चालक संदीप मोहिते हा त्याच्या ताब्यातील एमएच ०६ झेड–७८५५ ही घेवून जात असताना समोरुन आलेल्या टेम्पो (एमएच–०१ सीव्ही ७७९८)वरील चालक मिलिंद सपकाळ (वय ४३, रा.मुंबई) याने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून त्याची गाडी हयगयीने चालवून समोरुन स्कूल बसला जोरात धडक दिल्याने झालेल्या अपघातात स्कूल बसमधील आठ वर्षीय मुलगी तसेच १६ वर्षीय मुलगा हे दोघे जखमी झाले आहेत. तसेच स्कूल बसचे सुद्धा मोठे नुकसान झाले आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून टेम्पो चालकाला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## खोपोलीत बिबट्या असल्याचा संशय

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीतील भानवज व परिसरातील मोकळ्या जागेत संशयास्पद जंगली प्राणी वावरत असल्याचे सिसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे. तर याच भागातील एका भटक्या कुत्र्यांला बिबट्या सदृश्य प्राण्याचे दात लागल्याने जखमी झाल्याची बातमी सोशल मीडियावर व्हायरल झाली होती.

हाच जंगली हिंसक प्राणी बोरघाटातील शिंग्रोबा मंदिर परिसरातून रस्ता ओलांडत असताना वाहन चालकांनी पाहील्याचे वृत्त वाऱ्यासारखे पसरले याची दखल वनविभागाने घेत घटनास्थळी पाहणी केली तर खोपोली सायमाळ दरम्यान बिबट्याचा वावर असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार खालापूर आर. एफ. ओ. राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनानुसार ठीक ठिकाणी सूचना फलक प्रदर्शित केले आहेत. वनात होणारी अतिक्रमणे वनविभागाने थांबवली असती तर परिस्थिती नक्कीच वेगळी असती. अशी चर्चा सुरु आहे.

# पनवेल मनपा महापौर आणि उपमहापौरांचा पदग्रहण समारंभ

## परिसराची प्रगती साधण्याचा निर्धार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील यांनी गुरुवारी (दि.१२) अधिकृतरित्या मुख्यालयातील महापौर व उपमहापौर दालनाचा पदभार स्वीकारला. राजकीय दिग्गज आणि कार्यकर्त्यांच्या अलोट गर्दीत हा पदग्रहण सोहळा पार पडला.

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम म्हात्रे, भाजप ज्येष्ठ नेते वाय टी. देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, भाजपचे सर्व महापालिका सदस्य, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

महापौर व उपमहापौरांनी पदभार स्वीकारताच मालमत्ता कर, पाणीपुरवठा, शिक्षण विभाग, अतिक्रमण विभाग या अनुषंगाने विविध विषयांवरती आढावा बैठक घेतली. या बैठकिस सर्व महापालिका सदस्य, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त नानासाहेब कामठे, शहर अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, डॉ. रूपाली माने, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, महापालिका अधिकारी उपस्थित होते.

महापालिका क्षेत्रात पाण्याचा मोठा प्रश्न भेडसावतो आहे. खारघर, कामोठे, ग्रामीण भाग, कळंबोली, अशा सर्वच ठिकाणी पाण्याची कमतरता जाणवत आहे. यावरील उपाय योजनेवरती या वेळी चर्चा करण्यात आली. या अनुषंगाने महाराष्ट्र जलप्राधिकरण, सिडको, शिलार प्रकल्प, भविष्यकालीन मागणी, यासर्वांवर या वेळी चर्चा करण्यात आली.

महापालिका कामोठे व तळोजा याठिकाणी नवीन शाळा बांधणार आहे. याचबरोबर खारघर, कळंबोली, ग्रामीण भाग, नवीन पनवेल अशा नवीन चार शाळा बांधण्याच्या विषयांवर चर्चा झाली.

अतिक्रमण विभागाच्या माध्यमातून आठवडा बाजारांवर जोरदार कारवाई करावी अशा सूचना उपस्थित सदस्यांनी या वेळी केल्या. अतिक्रमण कर्मचारी वाढवून त्यासाठी वाहने घेऊन कारवाई करावी अशा सूचना यावेळी सदस्यांनी दिल्या. नोडनिहाय बैठका घेऊन यावर कठोर कारवाई करण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचित करण्यात आले.

दरम्यान, महापौर आणि उपमहापौर यांनी आपल्या दालनातील खुर्चीत बसण्यापूर्वी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद घेतले. पक्षनेतृत्वावर विश्वास दर्शवत, त्यांच्या मार्गदर्शनाखाली शहराची प्रगती साधण्याचा निर्धार दोन्ही पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

> **जनतेच्या समस्या सोडवण्याला सर्वोच्च प्राधान्य देणार आहे. रखडलेले प्रकल्प मार्गी लावून शहराचा कायापालट करण्याचा आमचा मानस आहे. शहरातील प्रत्येक नागरिकाला महापालिका आपली वाटली पाहिजे, असे लोकाभिमुख शासन देण्याचा आमचा प्रयत्न राहील.**
> **-नितीन पाटील,** महापौर

## निवडक

### भायखळ्यात लिफ्ट कोसळून पाच जण जखमी

**मुंबई :** भायखळ्यातील जयकृपा टॉवरमध्ये लिफ्ट कोसळली आहे. या लिफ्ट अपघातात पाच जण जखमी झाले. बुधवारी रात्री भायखळ्यातील जयकृपा टॉवरमधील घोडापदेव क्रॉस लेन क्रमांक १ येथे ही दुर्घटना घडली आहे. केबल तुटल्यामुळे लिफ्ट चौथ्या मजल्यावरून खाली कोसळली. यानंतर मुंबई अग्निशमन दल, पोलीस, बेस्ट, १०८ रुग्णवाहिका सेवा आणि बीएमसीचे वॉर्ड कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. यानंतर जखमींना रुग्णालयात नेण्यात आले.

### तब्बल ७८ वर्षांनंतर पंतप्रधान कार्यालयाचा पत्ता बदलणार

**दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी (दि.१३) दुपारी पंतप्रधान कार्यालयचा (पीएमओ) पत्ता बदलणार आहेत. तब्बल ७८ वर्षांनंतर पीएमओचे ऑफिस स्थलांतरित करण्यात येणार आहे. साउथ ब्लॉकमधून 'सेवा तीर्थ' नावाच्या नवीन बांधलेल्या इमारतीत हे ऑफिस हलवण्यात येणार आहे. त्यापूर्वी पंतप्रधान मोदी साउथ ब्लॉकमध्ये झालेल्या शेवटच्या मंत्रिमंडळ बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतील.

# माथेरानमधील ई-रिक्षा बंद तुर्तास स्थगित



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमधील ई–रिक्षा वाढीसाठी रिक्षा संघटनेने शासनाच्या धोरणाचा निषेध म्हणून जाहीर केलेला बेमुदत रिक्षा बंद आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला असून गुरुवारी सायंकाळपासून ई–रिक्षा सुरू करण्यात आल्या होत्या.

माथेरानमधील सरसकट ९४ परवाना धारक हात रिक्षाचालकांना ई–रिक्षा चालविण्याचा परवाना मिळावा याकरिता श्रमिक हातरिक्षा चालक–मालक संघटनेने दहा तारखेपासून बेमुदत रिक्षा बंदचा इशारा दिला होता. त्यानुसार सकाळपासून रिक्षा बंद ठेवण्यात आल्या होत्या, परंतु पालिकेमध्ये माथेरानचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी एक विशेष बैठक ई–रिक्षा संघटनेसोबत घेऊन १२ फेब्रुवारी रोजी सनियंत्रण समितीची बैठक होत असून त्यामध्ये ई–रिक्षावाढी संदर्भात निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगून तूर्तास हा बंद मागे घेण्याची विनंती केली होती व त्यांच्या विनंतीला मान देत रिक्षा संघटनेने हा बंद मागे घेतला असून संध्याकाळी ई–रिक्षा सुरू करण्यात आल्या आहेत.

ई–रिक्षा बंद आंदोलनामध्ये माथेरानकरांना नाटकीय घडामोडी पहावयास मिळाले संघटनेतील एकूण ९४ पैकी १३ सभासदांनी आपल्या हात रिक्षा बंद ठेवण्यास नकार दिला व या हात रिक्षा गावामध्ये सेवा देताना दिसून येत होत्या. त्यामुळेच संघटनेमधील गटबाजी समोर आली असून भविष्यामध्ये संघटना याबाबत काय ठोस भूमिका घेईल यावर चर्चा रंगली होती.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त

# रायगड जिल्हास्तरीय कबड्डी निवड चाचणी स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ७५वा वाढदिवस अर्थात अमृत महोत्सवी वर्ष अनेक समाजोपयोगी उपक्रमांद्वारे साजरे होत आहे. त्या अनुषंगाने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हास्तरीय प्रौढ महिला आणि पुरुष गटाची जिल्हा अजिंक्य पदाची निवड चाचणी कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

ही स्पर्धा शुक्रवार २० ते रविवार २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत उलवे नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलजवळील रामशेठ ठाकूर मैदानात संपन्न होणार आहे, **(पान २ वर..)**

### पूर्ण वर्षभर विविध सामाजिक उपक्रम

लोकनेते रामशेठ ठाकूर हे राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य देणारे लोकनेते म्हणून ओळखले जातात. यंदा त्यांच्या अमृत महोत्सवी (७५व्या) वर्षाचे औचित्य साधून कीर्तन महोत्सव, भजन स्पर्धा, रक्तदान शिबिर, शिधा वाटप, विविध क्रीडा स्पर्धा, नाट्य महोत्सव, अशा विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. पूर्ण वर्षभर विविध सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून या अमृत महोत्सवी वर्षाचा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्याच अनुषंगाने रायगड जिल्हास्तरीय प्रौढ महिला आणि पुरुष गटाची जिल्हा अजिंक्य पद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा होणार आहे.

> **अजितदादा पवार आणि कबड्डी यांचे अतूट नाते होते. आपल्या मातीतल्या या खेळाला त्यांनी नेहमीच मनापासून प्रोत्साहन दिले. विशेषतः रायगड संघाबद्दल त्यांना विशेष आपुलकी होती. त्यांच्या आशीर्वादामुळे रायगड जिल्ह्याचा संघ महाराष्ट्राच्या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत अव्वल स्थान पटकावेल, असा मला विश्वास आहे.**
> **-लोकनेते रामशेठ ठाकूर**

# सीकेटी विद्यालयाची 'सामाजिक बांधिलकी'

## माझ्या ७५ वर्षांच्या कार्याचा यथार्थ सन्मान -लोकनेते रामशेठ ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमिक विद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना, स्काऊट गाईड पथक, ग्रीन आर्मी दल, मुख्याध्यापक, पर्यवेक्षिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने सामाजिक संस्था करुणेश्वर वृद्धाश्रम व वनवासी कल्याण आश्रमशाळा येथे सामाजिक बांधिलकी उपक्रम या कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी (दि.१२) करुणेश्वर वृद्धाश्रम, भानघर, पनवेल येथे आयोजित करण्यात आला होता.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, ७५ वर्षात पदार्पण केल्यानंतर गेल्या ७५ वर्षात मी जे काही कार्य केले त्याचे यथार्थ दर्शन तुम्ही घडवून माझा सन्मान केला आहे, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, तर संस्थेचे सदस्य ॲड. राहुल घरत, संजय पाटील आदींनी सन्माननीय उपस्थिती लाभली. या सामाजिक कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन समिती प्रमुख स्वाती काळे आणि त्यांच्या टीमने केले होते. या वेळी सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाने वृक्षारोपण सोबतच वृद्धाश्रमातील वृद्धांना आरोग्यदायी भेट वस्तूंचे वाटप, वृद्धाश्रमासाठी डीप फ्रीजर, वनवासी कल्याण आश्रमाच्या विद्यार्थ्यासाठी स्कूल बॅग आणि शैक्षणिक वस्तूंचे वाटप, आश्रमासाठी लॅपटॉप भेट म्हणून देण्यात आले. या वेळी उपस्थित नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्यांचा सत्कार करण्यात आले.

सीकेटी तील एन सी सी कॅडेट, स्काऊट गाईड पथक, ग्रीन आर्मी दल या विद्यार्थ्यांनी यावेळी शिस्तबद्ध संचालन करून पाहुण्यांचे स्वागत केले. इंग्रजी माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता नववीचा विद्यार्थी रिषभ तानाजी देशमुख याने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत साहेबांच्या जीवनावर आधारित ध्वनीचित्रफित (डॉक्युमेंट्री) सादर केली. **(पान २ वर..)**

# नवी मुंबई वाहतूक पोलिसांना बॉडीवॉर्न कॅमेरे

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन



**नवी मुंबई : बातमीदार**

वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यासाठी गोवा राज्याप्रमाणे महाराष्ट्रातदेखील वाहतूक पोलीसांकडे बॉडीवॉर्न कॅमेरे अनिवार्य करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत केली होती.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत नवी मुंबई वाहतूक पोलिसांना बॉडी कॅमेरे देण्यात आले आहेत. त्याचे उद्घाटन उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. बॉडीवॉर्न कॅमेरा वाहतूक पोलिसांच्या छातीवर दिसणार असल्याने पोलिसांशी हुज्जत घालणाऱ्याना आता सावधान रहावे लागणार आहे.

नवी मुंबई पोलिसांना ४५ बॉडीवॉर्न कॅमेरे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या देण्यात आले आहेत. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी वाहतूक पोलिसांच्या छातीवर कॅमेरे बसविले.

या बॉडीवॉर्न कॅमेऱ्यामुळे वाहतूक पोलिसांनी चलन फाडल्यानंतर होणारे वाद विवाद टळणार आहेत. तसेच वाहतूक नियंत्रण करणे सोपे होणार असून वाहतूक पोलिसांचे लोकाशन, वाहतूकीची सद्यस्थिती काय आहे याचे चित्रिकरण केले जाणार आहे. तर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सीसीटिव्ही मॉनिटरींग सेंटरमध्ये याचा कॅमेऱ्याचा रेकॉर्ड ठेवला जाणार आहे.

# महिला उद्योजकांसाठी पर्यटन विभागाची आई योजना

## महिला उद्योजकांना लाभ घेण्याचे आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पर्यटन क्षेत्रात महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पर्यटन विभागाने सुरू केलेली महिला-केंद्रित 'आई' पर्यटन योजना ही महिलांसाठी सुवर्णसंधी ठरणार असल्याचे प्रतिपादन पर्यटन संचालनालयाच्या उपसंचालक डॉ. प्रज्ञा मनोहर यांनी केले. भास्करवाडी, पालघर येथे पालघर डिस्ट्रिक्ट टुरिझम डेव्हलपमेंट वेल्फेअर असोसिएशनच्या सदस्यांसोबत आयोजित चर्चासत्रात त्या बोलत होत्या.

३१ जानेवारी २०२६ रोजी आयोजित या चर्चासत्रात पर्यटन विभागाच्या 'आई' महिला-केंद्रित पर्यटन धोरणाची सविस्तर माहिती देण्यात आली. पर्यटन क्षेत्रात महिला उद्योजकांनी अधिकाधिक सहभाग नोंदवून स्वतःचा व्यवसाय उभारावा व या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले.

'आई' पर्यटन धोरणांतर्गत महिला उद्योजकांना पर्यटनाशी संबंधित व्यवसाय सुरू करण्यासाठी अधिकृत बँकेकडून रुपये १५ लाखाच्या मर्यादेत कर्ज मंजूर झाल्यास, त्या वरील व्याजाचा परतावा पर्यटन संचालनालयामार्फत देण्यात येणार आहे. हा व्याज परतावा १२ टक्क्यांच्या दराने किंवा कमाल रुपये ४.५० लाखांपर्यंत अथवा कर्ज कालावधी ७ वर्षे पूर्ण होईपर्यंत-यापैकी जे आधी घडेल त्या निकषांनुसार अदा करण्यात येणार आहे.

या योजनेमुळे महिला उद्योजकांना पर्यटन क्षेत्रात आर्थिक पाठबळ मिळणार असून, महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच स्थानिक पर्यटन उद्योगालाही चालना मिळण्यास मदत होणार आहे, असेही यावेळी सांगण्यात आले.

अधिक माहितीसाठी इच्छुक महिला उद्योजकांनी विभागीय पर्यटन कार्यालय, कोकण भवन येथे प्रत्यक्ष भेट देऊन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पर्यटन विभागामार्फत करण्यात आले आहे.

# मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर तेल गळती मुळे अपघात

## टँकर चालकावर गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर टँकर चालकाच्या निष्काळजी पणामुळे तेल गळती होवून इको कारचा अपघाताची घटना घडली असून टँकर चालका विरोधात खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर बुधवारी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास विनेगाव हद्दीत टँकर क्रमांक.एम. एच-०४ एफ.पी-१७०१ याचा ॲक्सल तुटल्याने चालकाने निष्काळजीपणाने टँकर रस्त्यावरच उभा केला. टँकरचे तेल रस्त्यावर सांडले.त्यानंतर टँकर चालकाने कोणतेही बॅरीकेटींग न करता येणारे वाहनांना कोणताही ईशारा न दिल्याने ईको कार सांडलेल्या तेलावर घसरून अपघात झाला.

सदर अपघातामध्ये ईको गाडीचे नुकसान झाले आहे. खालापूर पोलीस ठाणे येथे इको कार चालकाने टँकर चालका विरोधात तक्रार दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार रवि सोनावणे हे करीत आहे.

# श्रीवर्धन पं.स. भाजपच्या पूजा शिंदे यांचा विजय; विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात!

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**



जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये श्रीवर्धन पंचायत समितीच्या आराठी गणातून भाजपा महायुतीच्या उमेदवार पूजा शिंदे यांनी विजय संपादन केला. मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच त्यांनी आघाडी घेतली होती.

विजयानंतर बोलताना पूजा शिंदे यांनी हा विजय सर्वसामान्य जनतेचा आणि कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमांचे फळ असल्याचे सांगितले. गेल्या महिनाभरात महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतक यांनी घर-दार व आराम बाजूला ठेवून प्रचारासाठी जीवाचे रान केले. गावागावांत जाऊन मतदारांशी संवाद साधताना त्यांच्या अपेक्षा, अडचणी आणि विकासाबाबतच्या आशा समजून घेतल्या. जनतेने दाखवलेला विश्वास आमच्यासाठी प्रेरणादायी आहे, असे त्या म्हणाल्या.

प्रचार काळात आराठी गणातील विविध गावांमध्ये सभा, बैठका आणि घरोघरी भेटी घेऊन व्यापक जनसंपर्क साधण्यात आला. पाणीटंचाई, रस्ते, शिक्षण, जनतेचे प्रश्न, महिला सक्षमीकरण आणि युवकांसाठी रोजगाराच्या संधी या मुद्द्यांवर ठोस भूमिका मांडण्यात आली.

विकासाचा स्पष्ट आराखडा मतदारांसमोर ठेवण्यात आल्याने त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, श्रीवर्धन पंचायत समितीचे माजी सभापती तथा भाजप दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस प्रशांतजी शिंदे यांनीही या विजयाबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी महायुतीच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदान करून साथ देणाऱ्या प्रत्येक मतदाराचे मनःपूर्वक आभार मानले.

या विजयामुळे श्रीवर्धन पंचायत समितीत महायुतीची ताकद अधिक भक्कम झाली असून तालुक्यातील राजकीय समीकरणांवर त्याचा परिणाम होणार असल्याची चर्चा आहे.

## विवाहितेचा छळ; तिघांवर गुन्हा

**मोहोपाडा :** रसायनी येथे विवाहितेचा मानसिक आणि शारीरिक छळ केल्या प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत १६ डिसेंबर २०२३ ते ७फेब्रुवारी २०२६ दरम्यान घडली आहे. महिला फिर्यादी यांचे मुख्य आरोपी पती याने फिर्यादी यांना पत्नीचा दर्जा न देता मै तुम्हारा खानदान बरबाद कर दूंगा,खत्म कर दूंगा अशी वारंवार धमकी देऊन फिर्यादी यांचा मानसिक व शारीरिक छळ करून घरातून हाकलून दिले. तसेच सासू व सासरे आरोपी यांनी शिवीगाळ व मारहाण करून घरातून हाकलून दिले.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस पाटील हे करीत आहेत.

# सांगलीमध्ये होणार ६५वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन

## ज्येष्ठ कलावंत जी. एस. माजगावकर यांचा होणार विशेष सन्मान

**मुंबई : प्रतिनिधी**

कला संचालनालयामार्फत आयोजित '६५ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन (विद्यार्थी विभाग)' यंदा सांगली येथे आयोजित करण्यात येत असून, १६ ते २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कलाविश्व महाविद्यालय, शांतिनिकेतन आवार येथे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांचा विशेष गौरव हे यंदाच्या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण ठरणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.



पालक मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, राज्यातील शासकीय व खासगी कला संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला व्यासपीठ मिळावे या उद्देशाने हे प्रदर्शन दरवर्षी राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये आयोजित केले जाते. यंदा राज्यभरातून ३ हजार,४९० विद्यार्थ्यांच्या ५ हजार ६८० कलाकृती प्राप्त झाल्या असून, त्यापैकी निवड समितीने १,२७५ उत्कृष्ट कलाकृतींची प्रदर्शनासाठी निवड केली आहे. या प्रदर्शनादरम्यान ज्येष्ठ कलावंत जी. एस. माजगावकर यांच्या दीर्घकालीन कलात्मक आणि शैक्षणिक योगदानाचा गौरव करत महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

शालेय विद्यार्थ्यांसाठी यंदापासून एक नवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यापूर्वी केवळ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मर्यादित असलेल्या या व्यासपीठावर आता शासकीय रेखाकला परीक्षा (ग्रेड परीक्षा) व बालचित्रकला स्पर्धेतील गुणवंत शालेय विद्यार्थ्यांचाही गौरव केला जाणार आहे. शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना थेट राज्याच्या मुख्य कला प्रवाहात सहभागी करून घेण्याचा हा निर्णय कला क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तसेच महाराष्ट्राचा समृद्ध कला वारसा पुढील पिढीकडे पोहोचविण्यासाठी हे प्रदर्शन महत्वाचे ठरेल. सांगलीकर कलाप्रेमी, विद्यार्थी आणि शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कलाविष्काराचा आनंद घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

## प्रलंबित मागण्यांसाठी शासकीय कर्मचारी एकवटले

**अलिबाग : प्रतिनिधी**

आपल्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शासकीय कर्मचारी, शिक्षक व कामगारांच्या संयुक्त कृती समितीच्या वतीने गुरुवारी (दि. १२ ) रायगड जिल्हाधिकारी यांना आपल्या विविध मागण्यांचे निवेदन दिले कर्मचारी-शिक्षक समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष सुरेश पालकर, निमंत्रक प्रभाकर नाईक, सरचिटणीस संतोष पवार, राज्य सरकारी मध्यवर्ती संघटना जिल्हा तर्फे परशुराम म्हात्रे, दर्शना पाटील, महाराष्ट्र राज्य पेन्शनर्स संघटनेचे अध्यक्ष संदीप नागे, दर्शना कांबळे, सर्वहारा जन आंदोलनचे चंद्रकांत गायकवाड, विविध संघटनांचे पदाधिकारी आंदोलनात सहभागी झाले होते.

देशातील विविध कामगार-कर्मचारी संघटनांतर्फे आवाहनानुसार पुकारण्यात आलेल्या देशव्यापी संपाला पाठिंबा देण्यासाठी रायगड जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी हे आंदोलन केले. यात शासकीय कर्मचारी, शिक्षक, जिल्हा परिषद कर्मचारी तसेच निवृत्त कर्मचारी सहभागी झाले होते.



**उरण : ॲड. पराग म्हात्रे यांची उरण नगर परिषदेमध्ये भाजपतर्फे नामनिर्देशित सदस्य म्हणून बिनविरोध निवड झाल्याने आमदार महेश बालदी, भाजप उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, नगरसेवक जसिम गॅस व सर्व नगरसेवकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## अहिल्यानगर येथे बोध दिनानिमीत्त विशाल भंडारा

**ढवळपुरी: प्रतिनिधी**

संत रामपाल जी महाराज यांच्या ३९ व्या बोध दिवसानिमीत्ताने १५,१६ आणि १७ फेब्रुवारीला सतलोक आश्रम ढवळपुरी, ता. पारनेर जि. अहिल्यानगर येथे विशाल भंडारा आयोजीत करण्यात आला आहे.

या वेळी संत गरीबदास जी महाराज यांच्या मरवाणीचा अखंड पाठ तसेच हुंडा मुक्त विवाह, रक्तदान शिबिर, नि:शुल्क नाम दिक्षा, आध्यात्मिक प्रदर्शनीअसे अनेक कार्यक्रम होणार आहेत. या वेळी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे

## भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयवंत दळवी यांचे निधन

**महाड : प्रतिनिधी**



भारतीय जनता पार्टीचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष तथा ग्रुप ग्रामपंचायत चिंभावेचे माजी सरपंच जयवंत दळवी (वय ५४) यांनी मुंबई, चर्नी रोड येथील रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असताना बुधवारी दुपारी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, आई, भाऊ असा परिवार आहे.

जयवंत दळवी यांच्यावर सहा महिन्यांपूर्वी यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली होती. त्यांची मोठी मुलगी मधुरा दळवी हिने वडिलांसाठी आपले यकृत दान केले होते. यकृत प्रत्यारोपण यशस्वी शस्त्रक्रियेनंतर त्यांना चिंभावे येथे घरी आणले होते. ११ डिसेंबर रोजी त्यांच्या पोटात संसर्ग झाला आणि डाव्या बाजूला अर्धांग वायूचा झटका आला त्यामुळे उपचारासाठी त्याच हॉस्पिटलमध्ये पुनःश्च ॲडमिट करण्यात आले. दोन महिने त्यांच्यावर उपचार सुरु असताना मृत्यूशी झुंज देत त्यांची बुधवारी प्राणज्योत मावळली.

त्यांच्या आकस्मित निधनाने एक धुरंदर राजकारणी, समाजसेवक काळाच्या पडद्याआड गेला असल्याचे श्रद्धांजली वाहताना आमदार प्रवीण दरेकर यांनी आपले भाव व्यक्त करत सांगितले त्यांना वाचवण्यासाठी आपण खूप प्रयत्न केले मात्र नाही वाचवू शकलो. आम्ही चांगला सहकारी गमावला असल्याचे श्रद्धांजली वाहताना दरेकर यांनी सांगितले.

चिंभावे येथे गुरुवारी दुपारी दीडच्या सुमारास अंतिम संस्कारासाठी महाड तालुक्यासह जिल्ह्यातील बहुजन समाज, राजकीय, सामाजिक, पत्रकार क्षेत्रातील हजारो नागरिक उपस्थित होते.

आपल्या रोखठोक आणि तडाखेबाज भाषण कौशल्यासह प्रशासनाचा गाढा अभ्यासाच्या प्रभावशील व्यक्तिमत्वाने महाड तालुक्याच्या राजकारणामध्ये त्यांनी आपला ठसा उमटविला होता.

पान १ वरुन

## स्वयंसेवी संस्थांमुळे महाराष्ट्रातील परिवर्तनाला वेग -मुख्यमंत्री फडणवीस

या भागीदारींमुळे विविध कल्याणकारी शासकीय योजना अधिक लोकोपयोगी होण्यास मदत होणार आहे. शासनाच्या योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत आहे. टाटा ट्रस्टच्या सहकार्याने विविध विभागांच्या माध्यमातून सकारात्मक प्रभाव पाडण्यात यशस्वी होऊ. समाजातील सर्व घटकात उत्पन्न वाढून जगण्याचा स्तर उंचावण्यास यामुळे निश्चितच मदत होईल. दुर्धर आजारांवर महागड्या उपचार पद्धतीमुळे सामान्य नागरिकांना मर्यादा येतात मात्र राज्यात यापुढे उपचाराविना कुणीही मृत्यू पावणार नाही, अशी परिस्थिती निर्माण करण्यात येत आहे. टाटांची मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये मोठी मदत असून यामुळे आपण गरजू रुग्णांना निश्चित स्वरूपाची मदत देऊ शकतो.

**कराराचा उद्देश**

सामंजस्य करार तंत्रज्ञान, डिजिटल नवोपक्रम आणि 'लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी' याद्वारे आरोग्य, पोषण, जलसंधारण आणि ग्रामीण उपजीविका यांमधील शासकीय प्राधान्यक्रमांना पाठबळ देणे, समुदायांपर्यंत प्रमुख कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, नागपूर येथील सहा मान्यताप्राप्त रुग्णालयांसोबत केलेल्या करारांद्वारे, गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य देणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत दुर्धर गंभीर आजारांमध्ये सुलभ व कमी खर्चाचे उपचार उपलब्ध करून देणे आहे.

**असे आहेत करार**

टाटा ट्रस्टच्या सोबत शासनाने एकूण १२ करार केलेले आहेत. यामध्ये ग्रामविकास, जलसंधारण, सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास, गडचिरोली जिल्हा प्रशासन, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, नागपूर येथील राष्ट्रीय कर्करोग संस्था, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, मध्य भारत आयुर्विज्ञान संस्था, केअर हॉस्पिटल, स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन, मिदास मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल सोबत सामंजस्य करारांचा समावेश आहे. तसेच नाम फाउंडेशन, टाटा मोटर्स यांचा जलसंधारण विभागासोबत करार करण्यात आला आहे.

## रायगड जिल्हास्तरीय कबड्डी निवड चाचणी स्पर्धा

अशी माहिती रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे माजी सहकार्यवाह जे. जे. पाटील आणि आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक व जिल्हा पंच मंडळाचे अध्यक्ष शरद कदम यांनी गुरुवारी (दि. १२) उलवे नोड येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. या वेळी राज्याचे उपमुख्यमंत्री व राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष राहिलेले अजितदादा पवार यांना पत्रकार परिषदेच्या सुरुवातीला श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या सभागृहात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या पत्रकार परिषदेला माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, मंडळाचे सचिव व पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष हिराचंद पाटील, सूर्यकांत ठाकूर, खजिनदार जगदीश पाटील, समीर माने, जनार्दन पाटील, जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, वितेश म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, रत्नप्रभा घरत, ॲड. राहुल घरत, भार्गव ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि कबड्डीचे अतूट नाते असून या मंडळाने स्पर्धेला बळ दिले आहे. त्या अनुषंगाने पनवेलमध्ये कबड्डीचे दर्जेदार आयोजन असते असे जे. जे.पाटील यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे त्याबद्दल आभार मानले. त्यांनी स्पर्धे विषयी प्रसारमाध्यमांना अधिक माहिती देताना सांगितले कि, रायगड जिल्ह्यातील प्रौढ महिला व पुरुष कबड्डी खेळाडूंकरिता ही स्पर्धा जिल्हा अजिंक्य पदासाठी निवड चाचणी स्वरूपात घेतली जाणार असून, आगामी राज्यस्तरीय स्पर्धांसाठी संघ निवड करण्याच्या दृष्टीने या स्पर्धेला विशेष महत्त्व आहे.


या स्पर्धेत जिल्ह्यातील १९८ पुरुष कबड्डी संघ आणि ३२ महिला संघ भाग घेणार आहेत. त्या अनुषंगाने २७७२ पुरुष आणि ४४८ महिला असे एकूण ३२२० खेळाडू सहभागी होणार आहेत. १९८ कबड्डी संघांमधून पुरुष संघातून संभाव्य २० खेळाडूंची तर ३२ महिला संघामधून संभाव्य २० महिला खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. आणि त्यातून निवड झालेला १४ पुरुष खेळाडूंचा संघ व १४ महिला खेळाडू संघ महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाच्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये रायगडचे प्रतिनिधित्व करणार आहे. या दोन्ही संघाचा मार्गदर्शक सराव शिबिरसुद्धा श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे याच मैदानावर घेण्यात येणार आहे. तसेच दिनांक १३ फेब्रुवारीला रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या १०० पंचांचे एक दिवसीय मार्गदर्शक शिबीर पनवेलमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात होणार आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून उत्कृष्ट आणि चुरशीच्या सामन्यांची क्रीडारसिकांना मेजवानी मिळणार आहे.

लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित या क्रीडा स्पर्धेमुळे जिल्ह्यातील कबड्डी खेळाला चालना मिळून नवोदित खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी उपलब्ध होणार असून या स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत शुक्रवार २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता अनेक मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत होणार असून या स्पर्धेसाठी छत्रपती पुरस्कार विजेते, अर्जुनवीर, राज्य संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याचीही माहिती यावेळी देण्यात आली.

स्पर्धा संयोजन समितीचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी जनरल सेक्रेटरी ड. आस्वाद पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार स्पर्धेची तयारी करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने या स्पर्धेसाठी चार सुसज्ज मैदाने उभारण्यात येत असून सर्व खेळाडू व प्रेक्षकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मुख्य स्टेज, प्रशस्त प्रेक्षक गॅलरी, प्रथमोपचार केंद्र, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच इतर पूरक सुविधांचीही तयारी सुरू आहे.

स्पर्धेचे सुरळीत, पारदर्शक आणि शिस्तबद्ध आयोजन सुनिश्चित करण्यासाठी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे स्वयंसेवक तसेच सुमारे १०० नामवंत पंच कार्यरत असणार आहेत. त्यांच्या सहकार्यामुळे स्पर्धा उच्च दर्जाची आणि यशस्वी होईल, असा विश्वास या वेळी आयोजकांकडून व्यक्त करण्यात आला.

## सीकेटी विद्यालयाची 'सामाजिक बांधिलकी'




या स्तुत्य उपक्रमाचे लोकनेते रामशेठ ठाकूर आणि वाय. टी. देशमुख यांनी सुंदर नियोजनाबद्दल मुख्याध्यापक संतोष चव्हाण व त्यांच्या संपूर्ण स्टाफचे कौतुक केले. इंग्रजी प्राथमिकच्या इयत्ता तिसरीच्या रुद्र बाळकृष्ण पाटील याने लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांच्या संपूर्ण जीवन प्रवासाचा आलेख आपल्या भाषणातून ध्वनिचित्रफितीद्वारे सदर केले, तसेच दिनिशा, चिन्मयी शहा व दुर्वा भोसले या विद्यार्थ्यांनी साहेबांबद्दल कविता गायल्या. तसेच इयत्ता ९वी इंग्रजी माध्यमाच्या संस्कृत रोहेकर याने साहेबांच्या जीवनावर आधारित अप्रतिम असा पोवाडा गायला ज्याने संपूर्ण श्रोतेजण मंत्रमुग्ध झाले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विद्यालयाच्या शिक्षिका प्रगती शैलेश जाधव यांनी केले तर, आभार प्रकाश पांढरे यांनी मानले. विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, इंग्रजी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी, इंग्रजी पूर्वप्राथमिकच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या उपक्रमात सहभागी होत कार्यक्रम यशस्वी केला.


**दुखवटा**

## चंद्राबाई गोंधळी



**उरण :** तालुक्यातील चिरनेर - कातळपाडा येथीला चंद्राबाई मारुती गोंधळी (वय ८२)यांचे नुकतच वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले त्यांनी चिरनेर परिसरातील लोकांना कित्येक वर्षे डांग्या खोकला, दमा, कफ अशा विविध आजारांवर झाड - पाल्याचे औषध देण्याचे कार्य अखंडितपणे अगदी निस्वार्थीपणे केले. त्यांच्या मागे त्यांच्या कुटुंबात दोन मुलगे, सुना, तीन मुली आणि नातवंडे असा परिवार आहे.

## बेबीबाई ठाकूर



**उरण :** तालुक्यातील चिरनेर मुळपाडा येथील बेबीबाई वसंत ठाकूर (वय ८०) यांचे वृद्धपकाळाने सोमवारी (दि.९) दुःखद निधन झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते किरण ठाकूर, व स्वर्गीय रंगकर्मी शशिकांत ठाकूर यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात दोन पुत्र, एक कन्या, सुना, जावई, नातवंडे, पंतवंडे असा आप्त परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी बुधवारी (दि.१८) श्रीक्षेत्र चिरनेर खाडी येथे होईल. तर उत्तरकार्य विधी शुक्रवारी (दि. २०) दुपारी १२ वाजता चिरनेर मुळपाडा येथील राहत्या घरी होणार असल्याची माहिती नाट्यदिग्दर्शक संतोष ठाकूर यांनी दिली.

# बनावट सिमेंटच्या विक्रीप्रकरणी कारवाई

## तळोजा येथील गोदामांवर गुन्हे शाखेचा छापा

**पनवेल : वार्ताहर**

बांधकामासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक असलेल्या भेसळयुक्त सिमेंट बनविण्यात येत असलेल्या तळोजा भागातील एका गोडाऊनवर गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने छापा मारुन मोठया प्रमाणात भेसळयुक्त सिमेंटच्या गोण्या जप्त केल्या आहेत. विशेष म्हणजे हे भेसळयुक्त निकृष्ट सिमेंट नामांकित कंपन्यांच्या गोण्यांमध्ये भरुन त्याची बाजारात विक्री करण्यात येत असल्याचे तपासात आढळून आले आहे. तळोजा पोलिसांनी या प्रकरणात एका व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करुन त्याला ताब्यात घेतले आहे. तसेच पुढील तपास सुरु केला आहे.

तळोजा येथील रोहिंजण भागातील अमन मार्केट परिसरातील एका गोडाऊनमध्ये भेसळयुक्त सिमेंट तयार करण्यात येऊन सदरचे निकृष्ट सिमेंट नामांकित कंपन्यांच्या गोण्यांमध्ये भरुन त्याची बाजारात विक्री करण्यात येत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखा युनिट-२चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील व त्यांच्या पथकाने मंगळवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास रोहींजण येथील एका गोडाऊनवर छापा मारला. यावेळी सदर गोडाऊनमध्ये अल्ट्राटेक, अदानी अंबुजा आणि ए.सी.सी. या सारख्या नामवंत कंपन्यांच्या सिमेंटचा बनावट साठा करुन ठेवल्याचे आढळून आले.

त्यानंतर पोलिसांनी अल्ट्राटेक आणि अंबुजा कंपनीच्या सिमेंटने भरलेल्या ७३ गोण्या तसेच दगड झालेले निकृष्ट सिमेंट असलेल्या २५० पेक्षा जास्त गोण्या, सिमेंट गाळण्यासाठी लागणारी चाळणी, लोखंडी जाळी, नरसाळे आणि शेकडो रिकाम्या गोण्या अशा एकूण ५५,९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच सिमेंटमध्ये भेसळ करणार्या सुशील प्रकाश कटके याच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम १२५, ३१८(३), ३३६(४), आणि ३५०(१) अन्वये गुन्हा दाखल करुन त्याला ताब्यात घेतले आहे.

आरोपी मुदत संपलेले आणि दगड झालेले निकृष्ट दर्जाचे सिमेंट पुन्हा फोडून, गाळून त्याची पावडर तयार करत होता. त्यानंतर ही पावडर तो नामवंत कंपन्यांच्या रिकाम्या गोण्यांमध्ये बेकायदेशीरपणे भरुन त्यांची बाजारात विक्री करत होता. यामुळे सिमेंट कंपन्यांच्या नावलौकिकाला बाधा येत होती. तसेच अशा निकृष्ट सिमेंटमुळे बांधकामाच्या मजबुतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊन लोकांच्या जीविताला मोठा धोका निर्माण झाला होता.

# दोन भटक्या श्वानांचा विषप्रयोगाने मृत्यू

## अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**




अज्ञात व्यक्तीने पनवेल तालुक्यातील नेरे परिसरात वावरणार्या दोन निष्पाप भटक्या श्वानांवर विषप्रयोग करुन त्यांची हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पनवेल तालुका पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात व्यक्ती विरोधात प्राण्यांना क्रूरतेने वागवल्याबद्दल गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. या घटनेमुळे नेरे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, प्राणीमित्रांनी या कृत्याचा तीव्र निषेध केला आहे.

नेरे गावाजवळ असलेल्या कृष्णा किराणा दुकानाच्या परिसरात दोन भटक्या श्वानांचा संशयास्पद मृत्यू झाल्याचे आढळुन आले. या श्वानांना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने जाणीवपूर्वक विषबाधा होईल असे पदार्थ खाऊ घातल्याचा संशय स्थानिक नागरिकांमधुन व्यक्त केला जात आहे. सदर घटनेनंतर नेरे येथील रहिवासी अनुराधा पासी (वय ३६) यांनी हिंमत दाखवत पोलिसांत धाव घेतली. तसेच आपल्या परिसरातील मुक्या प्राण्यांवर झालेला हा अन्याय पाहून त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार नोंदवली. पनवेल तालुका पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेतली आहे.

अज्ञात व्यक्तीविरोधात प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० च्या कलम ११(१)(आय) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तसेच या घटनेतील दोषींचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, असे संकेत पोलिसांनी दिले आहेत.



उरण : न्हावे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे यांच्या मातोश्री बबीबाई दामोदर म्हात्रे यांचे नुकतेच निधन झाले. हे समजताच आमदार महेश बालदी यांनी जितेंद्र म्हात्रे यांच्या परिवाराचे सांत्वन केले. या वेळी न्हावेचे माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये भररस्त्यात महिलेवर जीवघेणा हल्ला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल-उरण मार्गावरील सर्विस रोडवर सायंकाळच्या सुमारास एका ३६ वर्षीय महिलेवर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. संगीता सोमनाथ भोईर असे गंभीर जखमी झालेल्या महिलेचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सायंकाळी पावणे सातच्या सुमारास आर-३/४ जवळील नाल्याजवळ ही घटना घडली. संगीता भोईर या मार्गावरून येत असताना अज्ञाताने त्यांच्यावर धारदार शस्त्राने सपासप वार केले. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून त्यांना उपचारासाठी तातडीने एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. या घटनेचे वैशिष्ट्य म्हणजे जखमी महिलेच्या अंगावर सोन्याचे दागिने होते, या हल्ल्याचा नेमका उद्देश काय होता, याबाबत पोलीस संभ्रमात आहेत. हा प्रकार लुटीच्या उद्देशाने झाला की यामागे काही जुने वैमनस्य आहे, याचा तपास आता पोलीस करत आहेत.

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस आयुक्त आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. भरवस्तीत आणि वर्दळीच्या मार्गावर अशा प्रकारे हल्ला झाल्याने नागरिकांमध्ये सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सध्या पनवेल शहर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात आहे.

महिलेला अधिक उपचारार्थ लाईफलाईन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. गुन्ह्याचा तपास करण्यासाठी तीन वेगवेगळी ठिकाणी पथके रवाना करण्यात आली आहे.



पनवेल : महानगरपालिकेचे महापौरपदी नितीन पाटील यांची निवड झाल्याबद्दल भाजपा व्यापार संघ पनवेलचे संजय जैन, स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे, पनवेल विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे, पनवेल शहर अध्यक्ष प्रशांत सोनावणे, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांनी शुभेच्छा दिल्या.



पनवेल : महानगरपालिकेचे महापौरपदी नितीन पाटील यांची निवड झाल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते रविंद्र पाटील, कल्पेश खंडागळे यांनी शुभेच्छा दिल्या.



पनवेल : कोळीवाडा येथील जरीमरी मंदिराचा २०वा वर्धापन दिन मंगळवारी उत्साहात झाला. यानिमित्त आयोजित कार्यक्रमांना नगरसेविका दर्शना भोईर यांच्यासह विठाबाई भोईर, पुजा भगत, भावना भोईर, वसुधा भगत, धरमी भगत, अरूणा पाटील सुनंदा पाटील आदींनी भेट दिली. आयोजकांकडून सर्वांचे स्वागत करण्यात आले.

# नवीन पनवेल येथे रोजगार मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदर्श शैक्षणिक समूहाच्या प्रांगणात भविष्याला दिशा देणारा, स्वप्नांना बळ देणारा आणि तरुणाईच्या आशांना नवे आकाश देणारा भव्य रोजगार मेळावा उत्साहात झाला.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पदवीधर प्रकोष्ठ, भारतीय जनता पार्टी, आदर्श शैक्षणिक समूह, नवीन पनवेल आणि युवा शक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा उपक्रम म्हणजे केवळ नोकऱ्यांचे व्यासपीठ नव्हे, तर युवकांच्या कर्तृत्वाला आकार देणारा प्रेरणास्त्रोत ठरला.

या कार्यक्रमास निरंजन डावखरे, आमदार, विधानपरिषद, कैलाश मोरे (य.च.म.मु.वि., नाशिक), डॉ. सतीश पवार, डायरेक्टर, युवा शक्ती फाउंडेशन, वामन नाखले, विभागीय संचालक, मुंबई विभागीय केंद्र, य.च.म.मु.वि., नाशिक, प्रशांत कांबळे, संगीता विसपुते तसेच विविध क्षेत्रांतून आलेले उद्योजक, कंपनी प्रतिनिधी, पालक व हजारो युवक, युवती उपस्थित होते.

या मेळाव्यासाठी ५० हून अधिक नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. दिवसभर झालेल्या मुलाखतींमधून असंख्य युवकांना रोजगाराची संधी प्राप्त झाली, तर अनेक उमेदवारांना तात्काळ ऑफर लेटर देण्यात आले हा क्षण अनेक कुटुंबांसाठी आशेचा आणि अभिमानाचा ठरला. नामांकित कंपन्यांची थेट उपस्थिती, कौशल्यविकास व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावरील मार्गदर्शनपर सत्रे यामुळे युवकांना नवी दिशा व आत्मविश्वास मिळाला. संधी, मार्गदर्शन, आत्मविश्वास या त्रिसूत्रीवर उभा राहिलेला हा मेळावा अनेकांच्या आयुष्यातील नवे वळण ठरला.

नोकरी ही अंतिम टप्पा नसून नव्या प्रवासाची सुरुवात आहे कौशल्य, शिस्त व निष्ठा यांवरच खरे यश उभे राहते हा संदेश या व्यासपीठातून अधोरेखित झाला. महिला व दिव्यांगांसाठी समान संधी, अप्रेंटिसशिप व ऑन-जॉब ट्रेनिंग, स्टार्टअप व स्वयंरोजगार, डिजिटल साक्षरता आणि उद्योग-महाविद्यालय समन्वय यांसारख्या विषयांवर झालेल्या मंथनातून सशक्त व उद्यमशील महाराष्ट्राचे स्वप्न अधिक तेजस्वी झाले.



# उरण महोत्सव मोठ्या उत्साहात

**उरण : वार्ताहर**

महेश बालदी मित्र मंडळ आणि अस्तित्व (महिला सक्षमीकरण संस्था) उरण यांच्या संयुक्त विद्यमाने उरण महोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले होते.

भाजप उरण शहर महिला अध्यक्ष संपूर्णा थळी, नगरसेविका रजनी कोळी, माजी नगरसेविका जान्हवी पंडित, अस्तित्व संस्था सभासद सानिका कदम, पूनम पाटेकर, हेमा घरत आदींनी सुंदर आयोजन केले होते.

उरण मधील उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम करीत असे अयोकांनी सांगितले. या कार्यक्रमात गेम आणि मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात खाद्य पदार्थ, कपडे, हस्तकला, गृह उपयोगी वस्तू, असे ५१ अधिक विविध स्टॉल होते.

या वेळी नीता बालदी, भाजप उरण तालुका महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, भाजप उरण शहर महिला अध्यक्ष संपूर्णा थळी, जान्हवी पंडित, संगीता गायकवाड, सीमा घरत, ललिता म्हात्रे, सुप्रिया म्हात्रे, शमिता ठाकूर, सानिका कदम, पूनम पाटेकर, हेमा घरत, आदी उपस्थित होत्या.

विघ्नहर्ता महिला बचत गट धुतुम (आगरी तडका) या वतीने खाद्य स्टोल लावण्यात आला होता. त्यात कोबी परोटा, पूरण पोळी, खजूर लाडू, पाव भाजी, चिकन थाळी, उकडीचे मोदक असे स्वादिष्ट पदार्थ विक्रीस ठेवण्यात आले होते. या वेळी भाजप जासई विभाग महिला अध्यक्षा शमिता दत्ता ठाकूर, विघ्नहर्ता महिला बचत गट (धुतुम)चे सदस्या रोशनी संतोष ठाकूर, गीता सुंदर ठाकूर, प्रीती राम पाटील, प्रगती प्रसाद म्हात्रे, नीलम ठाकूर, ज्योती प्रवीण पाटील, मानसी महेश ठाकूर, शोभा सुंदर ठाकूर आदींनी मेहनत घेतली. नीता बालदी यांनी स्टॉलला भेट देवून सर्वांचे कौतुक केले.



# सीकेटी महाविद्यालयात राष्ट्रीय मायक्रो बायो ऑलिंपियाड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नवीन पनवेल येथे या संस्थेचे अध्यक्ष तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या वतीने मंगळवारी (दि.१०) राष्ट्रीय स्तरावरील मायक्रो बायो ऑलिंपियाड स्पर्धेची भव्य अंतिम फेरी उत्साहात पार पडली.



या मायक्रो बायो ऑलिंपियाड अंतर्गत मायक्रो बायो कॅनव्हास, मायक्रो बायो पोडियम, मायक्रो बायो स्लेट, मायक्रो बायो रीड, मायक्रो बायो मॉडेल, मायक्रो बायो एआय, मायक्रो बायो वर्ड तसेच मायक्रो बायो क्विझ (पदवी व पदव्युत्तर) अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

छत्रपती संभाजीनगर येथील विज्ञान संस्थेच्या आयोजन सचिव डॉ. जयश्री भुतकर यांनी स्पर्धेच्या नियोजनाची जबाबदारी सांभाळली, तर चांगू काना ठाकूर आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे मायक्रोबायोलॉजी विभागाचे प्रमुख प्रा.एन. सी. वडनेरे यांनी कार्यक्रमाचे समन्वयन केले. मायक्रो बायो ऑलिंपियाडचे संस्थापक प्रा. डॉ. उल्हास पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमाचे यंदा २४ वे वर्ष साजरे करण्यात आले. मुंबई येथील विज्ञान संस्था आणि छत्रपती संभाजीनगर येथील विज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा पार पडली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी केले. या कार्यक्रमाच्या आयोजन समितीत महाविद्यालयाच्या प्रा. एन. पी. तिदार, प्रा. जी. एस. साठे, प्रा. ए. एन. गांधारकर, डॉ. ए. एन वेमुला, प्रा.नमिता गरुडे आणि डॉ. एस. व्ही. हुंबरवाडी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. आर.ओ. येवले यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ.वेमुला यांनी केले. या कार्यक्रमात लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा कार्याचा अल्पपरिचय प्रा. नम्रता कडू यांनी करून दिला. या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव यांनी मायक्रोबायोलॉजी विभागाचे कौतुक करून अभिनंदन केले. स्पर्धेतील पारितोषिक विजेत्या महाविद्यालयांमध्ये तृतीय वर्ष बी.एस्सी. गटात मुंबईतील एस.आय. ई.एस. महाविद्यालयाने प्रथम क्रमांक, जयहिंद महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक, तर जळगावच्या मूलजी जेठा महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटकाविला. द्वितीय वर्ष बी.एस्सी. गटात मुंबईतील मिठीबाई महाविद्यालय प्रथम, जयहिंद महाविद्यालय द्वितीय आणि के.सी. महाविद्यालय तृतीय ठरले. प्रथम वर्ष बी.एस्सी. गटात मुंबईतील विल्सन महाविद्यालयाने प्रथम क्रमांक मिळविला, तर के. जे. सोमय्या विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने द्वितीय आणि चर्चगेट येथील जयहिंद महाविद्यालयाने तृतीय क्रमांक संपादन केला.

# पनवेल तालुका अखिल भंडारी सेवा मंडळाचे वार्षिक स्नेहसंमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुका अखिल भंडारी सेवा मंडळाचे वार्षिक स्नेहसंमेलन रविवार ८ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्येष्ठ नागरिक हॉल, पनवेल येथे उत्साहात झाले. सुमारे ६०० सभासदांच्या उपस्थितीत हा सोहळा मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात संमेलनाध्यक्ष राष्ट्रपती पदक विजेते विजय हातिसकर, प्रमुख पाहुणे सुबोध तोडणकर, सत्कारमूर्ती नगरसेवक राजीव यशवंत किर (रत्नागिरी) तसेच मंडळाचे अध्यक्ष डॉ. दिपक खोत यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर व महासंघाचे अध्यक्ष नविनचंद्र बांदिवडेकर यांनी विशेष उपस्थिती दर्शवून सभेला मार्गदर्शन केले. त्यांनी समाजातील ऐक्य, शैक्षणिक प्रगती आणि सामाजिक बांधिलकी यावर भर देत मंडळाच्या कार्याचे कौतुक केले.

स्नेहसंमेलनात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांसाठी 'होम मिनिस्टर' स्पर्धा, ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान, विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा तसेच प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शनपर भाषण यामुळे कार्यक्रमाची शोभा वाढली. 'होम मिनिस्टर' स्पर्धेत विनीता शिवलकर यांनी प्रथम क्रमांक पटकावून पैठणी जिंकली, तर मेघना रुमडे व अनुष्का बागकर यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला.

या वेळी मंडळाचे अध्यक्ष डॉ. दिपक खोत, सेक्रेटरी रत्नराज महाडीक, खजिनदार श्रुती केळसकर, उपाध्यक्ष निशांत रिळकर, विनायक शिवलकर तसेच इतर मान्यवर कमिटी सदस्य उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. स्नेहसंमेलनामुळे सभासदांमध्ये आपुलकीचे वातावरण निर्माण झाले असून समाजबंध अधिक दृढ झाले आहेत.



## संपादकीय

# कठोर अंमलबजावणी हवी

एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनात येत्या काही वर्षांत प्रचंड बदल होणार आहेत हे एव्हाना बहुतेकांना माहीत झाले आहे. परंतु या तंत्रज्ञानाच्या आजच्या सुरुवातीच्या काळात ज्या तऱ्हेने विशेषत: समाजमाध्यमांवर त्याचा दिशाभूल करण्यासाठी वापर होताना दिसतो, तो मात्र अनेकांसाठी मनस्ताप देणारा ठरला आहे. एआयचा हा गैरवापर हाताबाहेर जाऊ नये म्हणून वेळीच त्याविरोधात कायद्यांमध्ये आवश्यक बदल व्हायलाच हवे होते. केंद्र सरकारने त्यादिशेने सुयोग्य पाऊल उचलले असून आता संबंधित नव्या नियमांची अंमलबजावणीही तितक्याच कठोरपणे व्हायला हवी.

**माहिती तंत्रज्ञानाच्या सध्याच्या युगात एआयचा बराच बोलबाला आहे. एआय म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता. एआयच्या वापराची नुकती कुठे सुरुवात झाली असून तूर्तास हे तंत्रज्ञान बाल्यावस्थेत असल्याचे मानले जाते. परंतु आगामी काळात एआयच्या वापरामुळे मानवी जीवनाशी संबंधित असंख्य बाबींमध्ये आपल्या कल्पनेच्या पलीकडचे अफाट बदल संभवतात हे एव्हाना बहुतेकांना ठाऊक झाले आहे. त्यामुळेच एआयविषयी सगळ्यांच्या मनात कुतुहल आहे. पण कुठलेही नवे तंत्रज्ञान आले की त्याचे जसे काही फायदे असतात तसेच त्याचा गैरवापर करणारेही लगेचच पैदा होतात. एआयच्या संदर्भात याचा अनुभव अगदी सुरुवातीपासून येतो आहे. समाजमाध्यमांमुळे कंटेंटनिर्मितीचा सुळसुळाट झालेला असताना हे अपेक्षितच होते. एआयच्या म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साह्याने तयार केल्या गेलेल्या कंटेंटचा वापर गैरहेतूने करणाऱ्यांना वेळेत अटकाव करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने नुकतेच माहिती तंत्रज्ञान कायदा २०२१ मध्ये सुधारणा करून ऑनलाइन प्लॅटफॉर्मसाठी अधिक कठोर नियम जारी केले आहेत. हे नवीन नियम २० फेब्रुवारी २०२६ पासून लागू होणार आहेत. एआयच्या मदतीने तयार केली जाणारी बनावट छायाचित्रे, चुकीची माहिती वा समज पसरवणारे व्हिडिओ या तंत्रज्ञानाविषयी पुरेशी माहिती नसणाऱ्या अजाण वापरकर्त्यांकडून समाजमाध्यमांवर सहजपणे पसरवले जातात. आपण जे भाबडेपणाने खरे मानून पुढे पाठवत आहोत ते एआयनिर्मित फेक म्हणजे बनावट कंटेंट आहे याची अनेकांना कल्पनाही नसते. पण यापुढे एआयच्या साह्याने बनवलेल्या सर्व कंटेंटवर 'एआयनिर्मित' असे लेबल लावणे केंद्र सरकारने केलेल्या नव्या कठोर नियमांनुसार बंधनकारक करण्यात आले आहे. सक्षम सरकारी अधिकाऱ्याने किंवा न्यायालयाने आक्षेपार्ह ठरवल्यास एक्स, फेसबुक, इन्स्टाग्राम यांसारख्या समाजमाध्यम मंचांना अशी एआयनिर्मित सामग्री तीन तासांच्या आत काढून टाकावी लागेल असा आदेशही नव्या नियमांनुसार जारी करण्यात आला आहे. यातून असे फसवे कंटेंट व्हायरल होण्याला अटकाव करता येईल. यापूर्वी अशी सामग्री हटवण्यासाठी या मंचांना ३६ तासांचा अवधी मिळत होता. वापरकर्त्यांच्या तक्रार निवारणाचा अवधी देखील कमी करण्यात आला आहे. सरकारने डिजिटल प्लॅटफॉर्म्सना दर तीन महिन्यांनी नियम आणि कायदे वापरकर्त्यांना (युजर्स) कळवण्याचे निर्देश दिले आहेत. एआयद्वारे तयार केलेली बेकायदा सामग्री शेअर केल्यास आयटी कायदा, पोक्सो कायदा किंवा लोकप्रतिनिधी कायद्याअंतर्गत कारवाई होऊ शकते याचे भान समाजमाध्यमे वापरणाऱ्यांना आता ठेवावे लागणार आहे. वापरकर्त्यांनी शेअर केलेली सामग्री एआयद्वारे तयार केलेली आहे का हे तपासण्याची जबाबदारी समाजमाध्यमे चालवणाऱ्या कंपन्यांवरच टाकण्यात आली आहे. लैंगिक शोषण करणारे, बोगस कागदपत्रांशी संबंधित, बालशोषण सामग्री वा स्फोटकांशी संबंधित बेकायदा एआय कंटेंट रोखण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.**

# राजिप सत्तेच्या चाव्या भाजपच्या हातात

**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर

रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणूकीचे निकाल सोमवारी लागले. कोणत्याच पक्षाला बहुमत मिळालेले नाही. शिवसेना शिंदेगट २१ जागा जिंकून सार्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्या खालोखाल राष्ट्रवारी काँग्रेसन १६ तर भाजपाने १५ जागा जिंकल्या आहेत. गेली कित्येक वर्षे रायगड जिल्हा परिषदेत सत्तेत असलेल्या शेकाप या निवडणूकीत एकही जागा जिंकू शकला नाही. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पावार गटाने १६ आणि भाजप १५ जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे हे दोन पक्ष एकत्र येऊन शिवसेना शिंदे गटाला सत्तेपासून रोखण्याची शक्यता आहे.राष्ट्रवारी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी तसे स्पष्ट संकेत दिले आहेत. कोणत्याच पक्षाला बहुमत नसल्यामुळे रायगड जिल्हा परिषदेच्या सत्तेच्या चाव्या भाजपाच्या हाती आल्या आहेत.

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ जागांसाठी १७३ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात होते. या निवडणूकीसाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान झाले होते. सोमावरी (दि. ९) जिल्ह्यात १५ मतमोजणी केद्रांवर मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात आले. शिवसेना शिंदे गटाने सार्वाधिक २१ जागा जिंकल्या. हा पक्ष मोठा पक्ष ठरला असला तरी त्यांना सत्ता स्थापनेसाठी इतर पक्षांवर अवलंबून रहावे लागणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने १६ जागा जिंकल्या आहेत. भाजपाने १५ जागा जिंकल्या आहेत. शिवसेना ठाकरे गटाने ५ तर काँग्रेसने २ जागा जिंकल्या आहेत. रायगड जिल्हा परिषदेत कित्येक वर्षे सत्तेत असलेला शेकाप एकही जागा जिंकू शकलेला नाही. भाजपच्या ३ जागा होत्या . त्या १५ झाल्या आहेत. भाजपाने रायगड जिल्हा परिषदेमध्ये प्रथमच इतक्या जागा जिंकल्या आहेत. रायगड जिल्हापरिषदेसाठी झालेल्या निवडणूकीत शिवसेना शिंदे गटाने सर्वाधिक २१ जागा जिंकल्या, पण राष्ट्रवादी काँग्रेस अजित पावार गटाने १६ आणि भाजप १५ जागा जिंकल्या आहेत. बहुमतासाठी ३० जागा हव्यात. भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेचे मिळून ३१ सदस्य होतात. त्यामुळे हे दोन पक्ष एकत्र येऊन सत्ता स्थापन करण्याची शक्यता जास्त आहे. बुधवारी (दि. ११) भाजपा आणि राष्ट्रवारी काँग्रेस दोन्ही पक्षांनी जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन आपले गट स्थापन केले आहेत. त्यामुळे सत्ता स्थापन्यासाठी आता राजकीय घडामोडीना वेग आला आहे.

रायगड जिल्हा परिषद निवडणूकीत कोणत्याही पक्षांची संपूर्ण जिल्ह्यात युती किंवा आघाडी झाली नाव्हती. सर्वच पक्षांनी सायिस्कर युती – आघाड्या केल्या होत्या. काणत्याच पक्षाला स्वबळावर सत्ता स्थापन करता येईल एवढ्या जाग जिंकता येणे शक्य नाही असाच अंदाज व्यक्त केला जात होता. तो खरा ठरला. शिसवेना शिंदे गटाने २१ जागा जिंकून तो मोठा पक्ष ठरला. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पावार गटाने १६ आणि भाजप १५ जागा जिंकल्या आहेत. या दोंन्ही पक्षांनी आपली ताकद दाखवून दिली आहे. शिवसेना ठाकरे गटाने ५ तर काँग्रेसने २ जागां जिकून जिल्हा परिषदेतील आपले अस्तित्व कायम राखले आहे. पण जिल्हा परिषदेवर सर्वाधिक काळ सत्ता उपभोगणार्या शेतकरी कामगार पक्षाला या निवडणुकीत एकही जागा जिंकता आलेली नाही. मागील निवडणूकीत शेकाप २३ जागा जिंकून मोठा पक्ष ठरला होता. रायगड जिल्ह्याच्या राजकराणात या पक्षाची ताकद होती. रायगड जिल्हा परिषदेत सर्वाधिक अध्यक्ष शेकापचे निवडून आले आहेत. या पक्षाचा जिल्हा परिषदेत एकही सस्य निवडून नयेणे या पक्षासाठी चिंतेची बाब आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसने उत्तर रायगड मध्ये शिवसेना ठाकरे गटासोबत येऊन निवडणूक लढवली. तर दक्षिण रायगड मध्ये भाजपला सोबत जुळवून घेतले. त्याचा फायदा राष्ट्रवादी काँग्रेसला झाला. त्यांचे १६ उमेदवार विजयी झाले. श्रीवर्धन, तळा, म्हसळा येथील सर्व जागा जिंकल्या. माणगाव आणि रोह्यातही त्यांनी आपले मतदारसंघ राखले. भाजपने पनवेल मध्ये जिल्हा परिषदेच्या सर्व ८ जागा जिंकल्या. पेण मधील पाच पैकी चार जागा भाजपने जिंकल्या, सुधागडमध्ये पक्षाचा एक उमेदवार निवडून आला .

जिल्ह्यात सर्वाधिक जिल्हा परिषदेच्या जागा शिवसेना शिंदे गटाच्या निवडून आल्या. त्यांचे २१ उमेदवार विजयी झाले. अलिबाग आणि महाड विधानसभा मतदारसंघात पक्षाला चांगले यश मिळाले. पण कर्जत , खालापूर मध्ये या पक्षाला अपेक्षीत यश मिळाले नाही. कर्जत मध्ये भाजपशी जुळवून न घेण्याचे धोरण शिवसेनेच्या आंगलट आले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेवर स्वबळावर सत्ता स्थापनेचे शिवसेना शिंदे गटाचे स्वप्न भंगले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पावार गटाने १६ आणि भाजप १५ जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे हे दोन पक्ष एकत्र येऊन शिवसेना शिंदे गटाला सत्तेपासून रोखण्याची शक्यता आहे. कोणत्याच पक्षाला बहुमत मिळालेले नाही. शिवसेना, भाजपा, राष्ट्रवारी काँग्रेस या तीन पक्षांपैकी कोणत्यातरी दोन पक्षांना एकत्र येऊन सत्ता स्थापन करावी लागणार आहे. त्यामुळे १५ जागा जिंकणारा भाजपा काय निर्णय घेतो यावर सर्व अवलंबून राहणार आहे.

**पक्षीय बलाबल–**
राष्ट्रवादी काँग्रेस – १६ ,भाजप – १५
शिवसेना शिंदे २१,कांग्रेस –२, उबाठा – ५

**राजिप निवडून आलेले उमेदवार**

**अलिबाग तालुका**
शहापूर – अमित नाईक , राष्ट्रवादी काँग्रेस
आंबेपूर – रसिका केणी, शिवसेना
आवास – दिलीप भोईर, शिवसेना
थळ – मानसी दळवी, शिवसेना
चेंढरे – आदिती दळवी, शिवसेना
चौल – सचिन राऊळ, शिवसेना
कावीर – अनंत गोंधळी, शिवसेना

**उरण तालुका**
नवघर – प्रेरणा पाटील, शिवसेना (ठाकरे)
जासई – डॉ. मनीष पाटील, काँग्रेस
चाणजे – रीना घरत, भाजपा
चिरनेर – अविनाश ठाकूर, काँग्रेस

**कर्जत तालुका**
कळंब – नारायण डामसे, राष्ट्रवादी काँग्रेस
कशेळे – वर्षा दोरे, राष्ट्रवादी काँग्रेस
कडाव – मारूती घारे, शिवसेना (ठाकरे)
माणगाव तर्फे वरेडी – सुवर्णा ठाकरे, राष्ट्रवादी कॉग्रेस
नेरळ – सुनीता मोरे, शिवसेना (ठाकरे)
मोठे वेणगाव – उषा ठोंबरे, राष्ट्रवादी काँग्रेस

**तळा तालुका**
चरईखुर्द – गीता जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस
रहाटाड – नलीनी लोखंडे, राष्ट्रवादी काँग्रेस

**खालापूर तालुका**
चौक – वैशाली खैर शिवसेना ठाकरे
वासांबे – नेहा पारंगे, भाजपा
सावरोली – संतोष बैलमारे
आत्करगाव – रेश्मा पाटील, शिवसेना

**पनवेल तालुका**
वावंजे – कमला देशेकर, भाजप
नेरे – आत्माराम भस्मा , भाजप
पाली देवद – प्राची जाधव, भाजप
वावेघर – अनन्या गाताडे, भाजप
गव्हाण – निकीता खारकर, भाजप
पळस्पे – हर्षदा घरत – भाजपा
वडघर – सोनाली जितेकर, भाजप
केळवणे – मंगेश वाकडीकर, भाजप

**मुरूड तालुका**
कोर्लई – ज्योती नागावकर, शिवसेना
राजपुरी – विघ्नेश माळी, शिवसेना

म्हसळा तालुका
पाभरे – अनिल बसवत, राष्ट्रवादी काँग्रेस
पांगळोली – अभिषेक विचारे, राष्ट्रवादी काँग्रेस

**पेण तालुका**
जिते – ताई दरवडा, भाजप
वडखळ – प्रभाकर म्हात्रे, भाजप
दादर – वैकुंठ पाटील, भाजप
महलमिरया डोंगर – जनार्दन भस्मा, भाजप
शिहू – पललवी भोईर, शिवसेना ठाकरे

**माणगाव तालुका**
निजामपूर – अविनाश नलावडे, शिवसेना
तळाशेत – दिशा जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस
मोर्बा – अस्लम राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस
गोरेगाव – दिनेश हरवंडकर, शिवसेना


**महाड तालुका**
बिरवाडी – मंदा ढेबे, शिवसेना
खरवली – मनाली काळीजकर, शिवसेना
दासगाव – मन्सूर ताज, शिवसेना
करंजाडी – निलेश ताठरे, शिवसेना
नडगाव तर्फे बिरवाडी – विकास गोगावले, शिवसेना

**रोहा तालुका**
नागोठणे – सुमित काते, शिवसेना
भुवनेश्वर – मधुकर पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस
घोसाळे – उर्वशी वाडकर, शिवसेना
आंबेवाडी – निधी जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस

**पोलादपूर तालुका**
कापडे बुद्रुक – निलेश कुंभार, शिवसेना
लोहारे – चंद्रकांत कळंबे, शिवसेना

**सुधागड तालुका**
जांभुळपाडा – शर्मिला बोडके, शिवसेना
राबगाव – चंद्रकांत वारगुडा, भाजपा

**श्रीवर्धन तालुका**
बोर्लीपंचतन – वासंती गुणाजी, राष्ट्रवादी काँग्रेस
आराठी – वैभवी कोमनाक, राष्ट्रवादी काँग्रेस




# तुमचंही व्हॉट्सॲप होऊ शकतं हॅक; 'या' सेटींग करून ठेवा!

सुरक्षित व्हॉट्सप वापरण्यासाठी तुम्हाला काही सेटींग कराव्या लागतील. या सेटींग तुम्ही केल्या तर तुमचे खाते हॅक होण्यापासून वाचू शकते.




तुमचे व्हॉट्सॲप अकाउंट सुरक्षित ठेवण्यासाठी, टु स्टेप व्हेरिफिकेशन सुरू करा.

स्टेप १ : सर्वात पहिल्यांदा तुम्हाला व्हॉट्सॲपवरील सेटिंग्ज मेनूमध्ये जावे लागेल.

स्टेप २ : यानंतर तुम्हाला प्रायव्हसी ऑप्शन निवडावा लागेल.

स्टेप ३ : येथे तुम्हाला टू–स्टेप व्हेरिफिकेशनचा पर्याय दिसेल. यावर क्लिक करुन सहा अंकी पीन सेट करावा लागेल.

जर एखाद्या अनोळखी नंबरवरून व्हॉट्सॲपवर मेसेज आला तर तो मेसेज काळजीपूर्वक उघडा. या मेसेजध्ये अनेकदा संशयास्पद लिंक्स शेअर केल्या जातात. यावर क्लिक करण्यापूर्वी नीट तपासा.

प्रायव्हसी सेटींग ठेवा

तुमच्या व्हॉट्सॲप खात्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी तुमच्या गोपनीयता सेटिंग्ज नेहमी अपडेट ठेवा. लास्ट सेटिंग ॲण्ड ऑनलाईन : या सेटींगला माय कॉन्टॅक्ट किंवा नोबडीवर सेट करा.

प्रोफाईल फोटो : यामध्ये माय कॉन्टॅक्ट सेट करा, कारण अनोळखी लोकांना तुमचा डीपी दिसणार नाही.

स्टेटस ॲण्ड अबाऊट : या सेटींगला माय कॉन्टॅक्ट असं करा. जर तुम्हाला अनोळखी नंबरवरुन फोन किंवा मेसेज येत असतील तर ते नंबर ब्लॉक करा.

ऑटो डाऊनलोड बंद करा

व्हॉट्सॲपवर ऑटोमॅटिक मीडिया फाइल डाउनलोडिंग बंद करा. असे केल्याने तुमच्या व्हॉट्सॲप चॅटवर येणारे फोटो, व्हिडिओ व कागदपत्रे थेट डिव्हाइसमध्ये सेव्ह होणार नाहीत.

ऑटो डाऊनलोड बंद करण्यासाठी पहिल्यांदा सेटिंग्ज मेनूवर जा. यानंतर तुम्हाला स्टोरेज आणि डेटा आणि मीडिया ऑटो–डाउनलोडवर जावे लागेल. येथे जा आणि सेटिंग कधीही नाहीवर सेट करा. तसेच तुमचे अकाऊंट कोणत्या डिव्हाईसवर लॉगिन आहे हे चेक करत जा.

# प्रसिद्ध कवयित्री सरोजिनी नायडू



**निमित्त**

सरोजिनी नायडू यांचा जन्म १३ फेब्रुवारी १८७९ रोजी हैदराबाद येथे झाला. त्यांच्या आईचे नाव वरद सुंदरी होते. त्या एक कवयित्री होत्या आणि बंगालीमध्ये लिहायच्या. त्यांच्या वडिलांचे नाव अघोरनाथ चट्टोपाध्याय होते, जे प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ होते.

'भारत कोकिळा' म्हणून प्रसिद्ध झालेल्या सरोजिनी यांनी वयाच्या अवघ्या १४व्या वर्षी सर्व इंग्रजी कवींच्या रचनांचा अभ्यास केला होता. १८९५मध्ये हैदराबादच्या निजामाने त्यांना शिष्यवृत्तीवर इंग्लंडला पाठवले. सरोजिनी नायडू या हुशार विद्यार्थिनी होत्या. त्यांना इंग्रजी, बंगाली, उर्दू, तेलुगू आणि पर्शियन भाषांचे चांगले ज्ञान होते. सरोजिनी यांचा विवाह १८९८मध्ये डॉ. गोविंद राजालू नायडू यांच्याशी वयाच्या १९व्या वर्षी झाला. त्यांनी घरीच इंग्रजीचा अभ्यास केला आणि वयाच्या १२व्या वर्षी मॅट्रिक पास केले. त्यांना तिचे शिक्षण पूर्ण करता आले नाही, परंतु इंग्रजी भाषेत कविता रचण्यात त्या हुशार होती.

नायडू यांनी गीत कविता या प्रकारात कविता निर्माण केल्या आणि त्यांच्या कविता १९०५, १९१२ आणि १९१७मध्ये प्रकाशित झाल्या. १९०६च्या कोलकाता अधिवेशनात गोखले यांच्या भाषणाने नायडू राजकारणात सक्रिय होण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. भारतीय समाजात पसरलेल्या दुष्कृत्यांसाठी त्यांनी भारतीय महिलांना जागृत केले. भारताच्या स्वातंत्र्यासाठी विविध चळवळींमध्ये सहकार्य केले. जालियनवाला बाग हत्याकांडामुळे संतप्त होऊन त्यांनी १९०८मध्ये मिळालेला 'कैसर–ए–हिंद' सन्मान परत केला.

भारत छोडो आंदोलनात आगा खान राजवाड्यात त्यांना शिक्षा झाली. त्या उत्तर प्रदेशच्या पहिल्या महिला राज्यपाल झाल्या. कुशल राजकारणी असण्यासोबतच त्या चांगल्या लेखिकाही होत्या. १९०३ ते १९१७ या काळात त्या टागोर, गांधी, नेहरू आणि इतर नायकांनाही भेटल्या. १९१४मध्ये त्या लंडनमध्ये महात्मा गांधींना पहिल्यांदा भेटल्या आणि गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाने त्यांना खूप प्रभावित केले.

गोपाळकृष्ण गोखले यांना त्या आपले 'राजकीय पिता' मानत. त्यांच्या विनोदी स्वभावामुळे त्यांना 'जेस्टर इन गांधीजीज मिनी कोर्ट' असे संबोधले जात असे. ॲनी बेझंट आणि अय्यर यांच्यासोबत त्यांनी १९१५ ते १८ या काळात तरुणांमध्ये राष्ट्रीय भावना जागृत करण्यासाठी भारताचा दौरा केला. १९१९च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्या गांधीजींच्या विश्वासू सहाय्यक होत्या.

१९१९मध्ये होमरूलच्या मुद्द्यावर त्या इंग्लंडला गेल्या. १९२२मध्ये त्यांनी खादी परिधान करण्याचे व्रत घेतले. १९२२ ते २६पर्यंत त्यांनी दक्षिण आफ्रिकेत भारतीयांच्या समर्थनार्थ आंदोलन केले आणि १९२८मध्ये गांधीजींचे प्रतिनिधी म्हणून त्या अमेरिकेला गेल्या.

सरोजिनी नायडू यांनी गांधीजींच्या अनेक सत्याग्रहांमध्ये भाग घेतला आणि छोडो भारत आंदोलनात त्या तुरुंगातही गेल्या. २ मार्च १९४९ रोजी वयाच्या ७०व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. नायडू यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी खूप संघर्ष केला. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा






## आरोग्य प्रहर

# झोपण्याआधी लसणाच्या तेलाने करा पायांची मालिश

लसणामध्ये असे अनेक औषधी गुण आढळतात, जे शरीराला वेगवेगळ्या प्रकारचे फायदे देतात. वेगवेगळ्या आयुर्वेदिक उपचारांमध्ये लसणाचा वापर केला जातो. लसणानं पचन तंत्र मजबूत राहतं, कोलेस्टेरॉल कमी होतं, सर्दी–खोकला बरा होतो, शरीर डिटॉक्स होतं. त्याचप्रमाणे लसणाचं तेलही फायदेशीर असतं. लसणाच्या तेलानं जर रात्री तळपायांची मालिश केल्यास अनेक फायदे होतात. खोबऱ्याच्या किंवा मोहरीच्या तेलात लसूण गरम केल्यावर या तेलानं पायांची मालिश केली तर कफ, सूज, श्वास घेण्याची समस्या किंवा फुप्फुसासंबंधी समस्या दूर करण्यास मदत मिळू शकते. त्यामुळे लसणाच्या तेलाने पायांना मसाज केल्यास अनेक फायदे होतात. यात झोपेची समस्या, पायांचे दुखणे, फुप्फुस समस्या तसेच हृदयाच्या समस्या दुर होण्यास मदत होते.



**झोपेची समस्या होईल दूर**

अनेकांना रात्री झोप न लागण्याची समस्या असते. अशात लसणाच्या तेलानं पायांची मालिस केली तर ही समस्या दूर होण्यास मदत मिळू शकते. या तेलानं मालिश केल्यास मांसपेशींना आराम मिळतो आणि शांत झोप लागते.

**फुप्फुसांची समस्या लागेल मार्गी**

जर तुमच्या छातीमध्ये कफ जमा झाला असेल आणि फुप्फुसाशी संबंधित समस्यांचा सामना करावा लागत असेल तर रात्री झोपण्याआधी लसणाच्या तेलानं पायांची मालिश करा. यानं श्वासासंबंधी समस्या दूर होईल.

**पायांचं दुखणं होईल कमी**

जर पाय कोणत्या कारणानं दुखत असेल तर लसणाच्या तेलानं पायांची मालिश करणं फायदेशीर ठरू शकतं. यानं पाायांचं दुखणं दूर होईल आणि मसल्सना आराम मिळेल.

**हृदयासाठी फायदेशीर**

लसूण खाणं ज्याप्रमाणे हृदयासाठी फायदेशीर असतं. तसंच लसणाचं तेलही हृदयासाठी फायदेशीर ठरतं. लसणाच्या तेलानं पायांची मालिश केल्यास शरीरात ब्लड सर्कुलेशन चांगल्याप्रकारे होतं. ज्यामुळे नसांमध्ये ब्लॉकेज होत नाहीत.

**तळपायांवर लसूण घासण्याचे फायदे**


हिवाळ्यात पायांवर लसूण घासल्यास उष्णता मिळते आणि तापही कमी होतो. दररोज लसणाची कळी पायांवर ठेवून थोडा वेळ चांगली घासली तर ब्लड सर्कुलेशनही चांगलं होतं.त्यामुळे हिवाळ्यात पाय दुखत नाहीत

# महाडच्या गांधारी नदीवरील पुल बांधकामात अंतर्गत चुका

## ◆ उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांची हरकत
## ◆ नगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे नव्याने काम

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरामध्ये प्रवेश करणाऱ्या गांधारी नदीवरील नव्याने बांधण्यात येणाऱ्या पुलाचे काम महाड नगरपालिकेच्या माध्यमातून केले जात होते. मात्र या कामाकडे नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष झाले व ठेकेदाराकडून बांधण्यात येणाऱ्या दोन पिलर पैकी एक पिलर काही अंतर चुकीच्या जागेवर बांधला गेला. ही बाब उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांच्या निदर्शनास येतात त्यांनी या कामावर हरकत घेऊन सदर पिलर पूर्ण तोडून नव्याने बांधण्याच्या सूचना केल्या व त्यानुसार महाड नगरपालिकेने सदर ठेकेदाराला हा पिलर तोडून नव्याने बांधण्याची व काम पुन्हा करण्याचे आदेश दिले आहेत.



महाड शहरामध्ये प्रवेश करणाऱ्या केंबुर्ली ते महाड या मार्गावरील गांधारी नदी येथील पूल नादुरुस्त असल्याने सदर पूल हा गेले कित्येक वर्ष वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता. महाड नगरपालिकेच्या वैशिष्ठ पूर्ण विकास योजने अंतर्गत नगर विकास खात्याकडून या पुलासाठी ८ कोटी ३५ लाख चा निधी मंजूर झाला होता. महाड नगरपालिकेने या कामाच्या कार्यारंभाचे आदेश टी अँड टी इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड पुणे या कंपनीला दिले. महाड नगरपालिकेमध्ये एकच अभियंता असल्याने, महाड शहरातील विविध विकास कामे व त्याचबरोबर सुरू असलेल्या या फुलाच्या कामाकडे या इंजिनीयरंना पाहण्यासाठी वेळ मिळत नसल्याने, ठेकेदाराने दोन पिलर पैकी क्रमांक एकचा पिलर चुकीच्या जागी उभा केला.

स्थानिक नगरसेवक वजीर कोंडेकर यांच्या ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांना याबाबतची माहिती दिली. पुलाच्या या चुकीच्या कामाचे गांभीर्यता लक्षात घेऊन संदीप जाधव यांनी सदर काम तात्काळ थांबून चुकलेला पिलर तात्काळ तोडून नव्याने बांधण्याची पत्र नगरपालिकेला दिले. या कामाचे तांत्रिक सल्लागार डॉक्टर सचिन पोरे प्राध्यापक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे यांनी या कामाची पाहणी केली असता, क्रमांक एकचा पिलर हा आबारमेंट च्या मध्य रेषेपासून जवळपास एक मीटर अंतराने बाजूला सरकला होता. सदर पिलरचे झालेले काम हे तात्काळ तोडून या जागी एका रेषेमध्ये नव्याने दुसरा पिलर उभारावा अशा सूचना नपा ला दिल्या. त्या सूचनेच्या आधारे महाड नगरपालिकेचे अभियंता प्रवीण कदम यांनी सदर ठेकेदाराला हा पिलर पूर्णपणे तोडण्याचे आदेश दिले असून ठेकेदाराने देखील सदर पुलाचे पिलर तोडण्यास सुरुवात केली आहे. या पुलाच्या चुकीच्या कामामुळे भविष्य मोठी दुर्घटना होण्याचा धोका होता.

पुलाचे हे चुकीचे काम वेळीत लक्षात आल्यामुळे मोठी दुर्घटना किंवा मोठा अनर्थ टळला आहे.

> **या पुलाचे काम करण्यासाठी महाड नगरपालिकेची यंत्रणा सक्षम नाही. हे काम तत्काळ सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात यावे व या पुढील कामाची बांधणी व पाहणी त्या मार्फतच व्हावी**
> **–संदीप जाधव, उपनगराध्यक्ष महाड**

# महाड सुदर्शन केमिकल इं.लि.कंपनीमध्ये अपघात

**महाड : प्रतिनिधी**

सुदर्शन केमिकल या कारखान्यात लिफ्ट मॅन काम करीत असताना अचानक लिफ्ट पुढे गेल्याने सुर्यकांत शिर्के हे लिफ्ट मॅन गंभीर जखमी झाल्याने महाड येथील खाजगी रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी पुणे येथे उपचाराकरिता पाठविण्यात आले आहे.

महाड एमआयडीसी सुदर्शन केमिकल इं. लि. मध्ये वायु गळतीची घटना ताजी असतानाच सायंकाळच्या सुमारास कंपनी मध्ये लिफ्ट मॅन काम करीत असताना अचानक लिफ्ट पुढे गेल्याने सुर्यकांत शिर्के हे लिफ्ट मॅन गंभीर जखमी झाल्याने महाड येथील खाजगी रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी पुणे येथे उपचाराकरिता पाठविण्यात आले आहे असे सुदर्शन कंपनी चे व्यस्थापक सुरेश काशीद यांनी सांगितले.

काही दिवसापूर्वी सुदर्शन कंपनीमध्ये ग्रीन पिगमेंट क्लोरीन वायूची गळती होऊन पाच कामगार जखमी झाले होते



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, सिडको लि. यांनी २२.५ टक्के योजनेनुसार संपादीत मिळकतीपोटी वितरीत केलेला खालील वर्णनाचा भूखंड **मे. प्रसाद कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार श्री. अनिल ठक्करशी ठक्कर व श्री. भागचंद चुवडमल खुबचंदानी** यांच्या नावे हस्तांतरीत झालेला आहे. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे:–

**मौजे–पुष्पक नोड (वडघर), ता. पनवेल, जि. रायगड.**

| भूखंड नं. | सेक्टर नं. | क्षेत्र |
|---|---|---|
| ७८ | १ | १८० चौ.मी. |

आमचे अशिल वर नमूद भूखंड **मे. प्रसाद कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार १) श्री. अनिल ठक्करशी ठक्कर, २) श्री. भागचंद चुवडमल खुबचंदानी** यांच्याकडून त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करून घेण्याच्या विचारात आहे.

तरी वर नमूद मिळकतीवर/भुखंडावर वा त्याच्या कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह **मा. व्यवस्थापक, शहर सेवा–२, पहिला मजला, सिडको भवन, सि.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** अथवा खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर भूखंड निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही आणि असल्यास त्या सोडून दिलेल्या आहेत असे समजण्यात येईल व सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करण्यात येईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**पनवेल**
**दि. १२/०२/२०२६**

**सही/–**
**ॲड. प्रशांत अ. भुजबळ.**
**कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट**
**वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ**
**अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**परिशिष्ट क्र. १६**
(उपविधी क्र. ३५ अन्वये)
**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना**

## नोटीस

**सरकारी नोकर** सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा / बंगला क्र. ...... धारण करणाऱ्या **श्री. मोतीराम गोपाळ अस्वले** यांचे तारीख १४/१२/२०२५ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी १२:०० वा. ते दुपारी ४:०० वा. पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

**ठिकाण : नवीन पनवेल**
**दिनांक : १२/०२/२०२६**

**सही/–**
**सचिव**
सरकारी नोकर... सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, नवीन पनवेल

**PUBLIC NOTICE** EXh 10/D

**ADV GEETA CHAUDHARY**

**IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D) AT PANVEL**

**Civil Miscellaneous Application No. 1606of 2025**

Petition for the Probate of the last Will and Testament dated 19th day of September, 2011 of late Shri Omprakash Gupta son of Late Shri Shankaer Lal Gupta, aged about 84 years, Hindu Indian Inhabitant of Mumbai, Occupation: retired, residing at the time of his death at Flat No. B-2603, Sai Mannat Co-operative Housing Society Limited., Plot No. 1, 1 A, Sector 34 A, Kharghar, Distt Raigad, Maharashtra. – 410210.

....Deceased

SHRI PRAVEEN GUPTA
Age about 50years, Hindu Indian Inhabitant of Mumbai, Occupation: Service, residing at Flat No. B-2603, Sai Mannat Co-operative Housing Society Limited., Plot No. 1, 1 A, Sector 34 A, Kharghar, Distt Raigad, Maharashtra. – 410210.
I being executor under the last Will and Testament of the deceased abovenamed.

Petitioner

Vs

NIL

Applicant isSon of Late **Mr. Omprakash Gupta** who died on 01/04/2025 at Kharghar, Tal Panvel, Distt Raigad. The copy of Death certificate issued by the Municipal Corporation of Panvel.

The Description of Immovable Property mentioned in the Last **Testamentary Will**,of deceased Late **Mr. Omprakash Gupta.**

**SCHEDULE No. - I**

**SCHEDULE OF PROPERTY**

**VALUATION OF IMMOVABLE PROPERTY OF THE DECEASED**

| Sr, No. | Description | Value (Approx) |
|---|---|---|
| 1. | Flat No. B-2603, Sai Mannat Co-operative Housing Society Limited., Plot No. 1, 1 A, Sector 34 A, Kharghar, Distt Raigad, Maharashtra. – 410210. **Ownership status** –it is co-owned. Total Area 77.253 sq. mtrs. being **Value attributable to the deceased's share** a sum of (50%) (Self Acquired-fetching no rent) The said property is jointly owned by Late Shri Omprakash Gupta and the Petitioner. The undivided 50% share of Late Shri Omprakash Gupta in the said property constitutes the estate left behind by him and is accordingly included in the Schedule annexed hereto. The total value of the said property is Rs. 1,80,00,000/-. | Rs. 90,00000/- |
| 2. | Agriculture Land parcel No. 575 at Village Kamona, District Bulandshehr, Uttar PradeshArea - 2.0970 hectare | Rs. 90,00,000/- |
| 3. | Agriculture Land parcel No. 576 at Village Kamona, District Bulandshehr, Uttar Pradesh. Area – 0.0510 hectare | Rs. 2,00,000/- |
| **Total** | | Rs. 1,82,00,000/- |

Where the above-named Applicant **Mr. PRAVEEN GUPTA** has filed the present Application for the **Probate as per the provisions contained inSection 276** of the Indian Succession Act, 1925in the Court of Civil Judge Service Division at Panvel.

You the members of the Public are hereby given notice to appear in the court of Civil Judge (S.D) Panvel in person or by pleader. Duly instructed and to file your say/objection if any within 30 (Thirty) Days from the date of publication of this Public Notice or before 4th March 2026, failing which said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under my hand and the seal of this Court on this 11 day of 02, 2026.

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
सहाय्यक अधिक्षक
(प्रशासन) दि. न्या. व स्तर, पनवेल

# रोहा तालुक्यात घरफोडींचा वाढता सुळसुळाट

## भाजपकडून पोलिसांना निवेदन

**धाटाव : प्रतिनिधी :**

रोहा शहर व तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून घरफोडी व चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः निवासी भागांमध्ये सलग घडणाऱ्या घरफोडींमुळे नागरिक असुरक्षिततेची भावना व्यक्त करत आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या वतीने रोहा पोलीस ठाण्यात गुरुवारी (दि.१२) निवेदन देत तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.



भाजपचे रोहा तालुका अध्यक्ष अमित हरिभाऊ घाग यांनी पोलीस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, शहरातील काही भागांमध्ये रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त अपुरी पडत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने येत आहेत. तसेच अनेक ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत नसणे, काही भागात स्ट्रीट लाईट बंद असणे यामुळे चोरटच्यांना संधी मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी नागरिकांमध्ये भीती व अस्वस्थतेचे वातावरण पसरले आहे. तर निवेदनात रोहा शहर व संवेदनशील भागांमध्ये रात्रीची पोलिस गस्त तातडीने वाढवावी, अलीकडे घडलेल्या घरफोडी प्रकरणांचा जलदगतीने तपास करून आरोपींना अटक करावी, सीसीटीव्ही फुटेज तपासण्यासाठी विशेष पथक नेमावे, तसेच नागरिक व पोलिस प्रशासन यांच्यात समन्वय बैठका आयोजित करून सुरक्षा उपाययोजनांबाबत जनजागृती करावी. याशिवाय संशयित व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

रोहा हे औद्योगिकदृष्ट्या व व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे शहर असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते. अशा परिस्थितीत वाढत्या चोरीच्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिस प्रशासनाने तत्काळ प्रभावी पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन केलेल्या कारवाईची माहिती जाहीर करावी, अशी विनंतीही निवेदनातून करण्यात आली आहे.

या वेळी भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग, नगरसेवक रोशन चाफेकर, रोहा धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस वैभव कुलकर्णी, युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष दिपक मोरे उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

मा.राठोड मॅडम कोर्ट
ॲड. प्रणाली सोहनी

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात.

दिवाणी चौकशी अर्ज नं. १४८/ २०२६
नि.नं. ८/५
नेता १०/०३/२०२६

१. श्री. जगदीश रामदास कोळी
वय ४६ वर्षे, धंदा– शेती –
२. श्री गोविंदा रामदास कोळी
वय – ३७ वर्षे, धंदा – शेती
३. सौ. प्रतिभा उमेश कोळी
–वय – ३३ वर्षे, धंदा गृहिणी
अर्जदार नं. १ ते ३ सर्व रा. मोहा गांव, उलवा, तरघर ता. पनवेल जि. रायगड
४. सौ. संजुला विनोद कोळी
वय – ३८ वर्षे, धंदा गृहिणी –रा. घर नं. ३०२, सेक्टर ३, बेलपाडा, खारघर नवी मुंबई
५. सौ. मिना रमेश कोळी वय ४२ वर्षे, धंदा– गृहिणी रा. दिवाळे गांव, से.१४, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई
६. श्रीमती बेबीबाई रामदास कोळी
वय – ६० वर्षे, धंदा गृहिणी रा. मोहा गांव, उलवा, तरघर जि. रायगड
— अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस हया जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार नं. १ ते ५ यांचे वडिल व अर्जदार नं. ६ चे पती कै. रामदास गणपत कोळी हे ता. ६/५/२०२५ रोजी मौजे मोहा गांव, उलवा, तरघर ता. पनवेल जि. रायगड येथे निधन झाले आहेत. कै. रामदास गणपत कोळी यांचे पश्चात त्यांना अर्जदार १ ते ६ हे कायदेशीर वारस आहेत.

कै. रामदास गणपत कोळी यांचे सामाईक मालकी व हिश्यास असलेल्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क. गांव /युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. गुं.आ. |
|---|---|---|---|
| १. तरघर / ११ | २८ | २ | ०–०३–४<br>पो.ख. ०–००–४<br>०–००–८ |
| २. तरघर /एस.आर.आम./९४ | ३० (पै) | – | ०–०८–४ |
| ३. ओवळे/९२ (ओवळे/एस.आर. २१) | १७९+१८०–१८२+१८४ | २१ | ०–०७–८ |
| | -- //-- | १९ | १–१७–०<br>१–२४–८ |

येणेप्रमाणे मिळकती असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने सिडकोकडून कै. रामदास गणपत कोळी यास गांवठाण विस्तार योजने अंतर्गत भूखंड मिळणार आहेत. सदर भूखंड कै. रामदास गणपत कोळी यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयांत अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार हयांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आंत या में कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्यापुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणा–या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. आज ता ६/२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/–**
**क लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल**

# जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे फुटबॉल फॉर स्कूल कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर ता. माणगाव जिल्हा रायगड येथे गुरुवारी (दि.१२) अखिल भारतीय फुटबॉल महासंघ व भारतीय क्रीडा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने, शिक्षा मंत्रालय,भारत सरकारच्या वतीने राबवला जात असलेला 'फुटबॉल फॉर स्कूल' हा उपक्रम साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून नितीन बडे उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून निवृत्ती बोराडे ,पोलीस इन्स्पेक्टर माणगाव तसेच अश्विनीराजे जाधवराव, प्राचार्य नवयुग स्कूल महाड हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना फुटबॉल खेळाची आवड निर्माण व्हावी त्याचबरोबर शारीरिक, मानसिक, भावनिक, सांघिक एकता व निर्णय क्षमता इत्यादी कौशल यांची वृद्धी व्हावी हा आहे. विद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत राघमवार, शिक्षक अरविंद्र सिंह यादव तसेच पूर्व जोशी यांच्या कुशल नेतृत्वात जवळजवळ रायगड जिल्ह्यातील २३ विद्यालयातील शिक्षक प्रतिनिधींना १८६ फुटबॉल वितरित करण्यात आले.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे शिवकर, तहसील – पनवेल, जिल्हा – रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे शिवकर, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र – लावणी लायक (हे.आर.प्रती) | क्षेत्र – पोटखराबा (हे.आर.प्रती) | क्षेत्र – एकुण क्षेत्र (हे.आर.प्रती) | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ७५/२/२ | १ | ०–१७–९० | ०–०२–१० | ०–२०–०० | ४.०६ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १२/०२/२०२६

**सही/–**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** – शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६ संपर्क :– ८८८८२७१७५९

# नवी मुंबईत शाळांमध्ये स्वच्छता जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ भारत मिशनच्या वतीने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सुरू झालेल्या 'स्वच्छ सवयींमधून स्वच्छ भारत' अर्थात 'स्वच्छ आदत से स्वच्छ भारत' या उपक्रमाच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविले जात आहेत. यामध्ये शहराचे भविष्य असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनावर स्वच्छतेचे संस्कार रूजविण्यावर भर दिला जात असून ज्या माध्यमातून शहराचे उद्याचे नागरिक हे स्वच्छताप्रेमी असतील.



याची सुरूवात नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांपासून करण्यात आलेली असून टप्प्याटप्प्याने खाजगी शाळा–महाविद्यालयांमध्येही नाविन्यपूर्ण जनजागृती उपक्रम प्रभावीपणे राबविण्यावर भर देण्यात येत आहे. 'स्वच्छ आदत से स्वच्छ भारत' अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी वैयक्तिक आणि सार्वजनिक स्वच्छता राखण्यासाठी ७ महत्वाच्या सवयींचे पालन करणे अपेक्षित आहे. याकरिता ए.जी.एनव्हायरो आणि आरंभ क्रिएशन्स कलासंस्था यांच्या माध्यमातून शाळांमध्ये मनोरंजनपर पथनाट्यातून स्वच्छतेच्या ७ सवयींविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली जात आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळा क्र. ६, ९, १०, ११ आणि १२ अशा ५ शाळांपासून या जनजागृती अभियानाची सुरूवात करण्यात आलेली असून सर्व ८० शाळांमध्ये पथनाट्य सादर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. स्वच्छतेच्या या ७ सवयींमुळे आजारांचा प्रसार रोखण्यास आणि आरोग्यपूर्ण जीवन जगण्यास मदत होणार असून त्याचीच माहिती रंजक पध्दतीने विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यात येत आहे.

स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक अशा सात सवयींमध्ये – रस्त्यावर कचरा टाकू नये, सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये, ओला – सुका कचरा वर्गीकरण निर्मितीच्या ठिकाणी म्हणजे घरातूनच करावे, प्लास्टिक पिशव्या व सिंगल यूज प्लास्टिक वापरण्याचे पूर्णपणे बंद करावे, हात नियमितपणे स्वच्छ धुवावेत, 'थ्री आर' म्हणजे कचरा कमी करणे व कचऱ्याचा पुनर्वापर करणे आणि कच–यापासून पुनर्निर्मिती करणे ही त्रिसूत्री उपयोगात आणावी, स्वच्छतागृहांचा वापर करावा व ती फ्लश करून स्वच्छ ठेवावीत – अशा सात सवयींचा समावेश असून त्या आपल्या जीवनशैलीचा भाग व्हाव्यात असे आवाहन पथनाट्यासारख्या प्रभावी कलात्मक माध्यमातून करण्यात येत आहे. या पथनाट्यांना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

## कोपरखैरणेमध्ये डासांचा उपद्रव
### परिसरात धूर फवारणी

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे प्रभाग क्रमांक १३ कोपरखैरणे परिसरामध्ये मागील काही दिवसांपासून डासांचा प्रचंड उपद्रव वाढला होता. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत होते तसेच नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. याबाबत अनेक नागरिकांनी भाजपच्या नगरसेविका वैष्णवी नाईक याच्याकडे तक्रारी केल्या होत्या.

या गंभीर समस्येची दखल घेऊन नाईक यांनी तातडीने पालिकेशी संपर्क साधत स्वतः उभं राहून संबंधित अधिकाऱ्यांशी सतत पाठपुरावा करून धूर फवारणी करून घेतली. नागरिकांनीही आपल्या परिसरात स्वच्छता राखावी, साचलेले पाणी काढावे आणि डासांची उत्पत्ती होऊ नये यासाठी सहकार्य करावे असे आवाहन नगरसेविका वैष्णवी नाईक यांनी केले आहे.



# 'हिंद दी चादर' कार्यक्रमासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करण्याच्या सूचना

**नवी मुंबई : बातमीदार**

'हिंद दी चादर' कार्यक्रमासाठी येणाऱ्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींपासून सामान्य नागरिकांपर्यंत कोणालाही कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये. यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणांनी सूक्ष्म नियोजन करून परस्पर समन्वयाने काम करावे आणि कार्यक्रम शिस्तबद्ध व शांततापूर्ण पद्धतीने पार पाडावा, अशा सूचना कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या.

श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त दि. २८ फेब्रुवारी व ०१ मार्च २०२६ रोजी खारघर, सेक्टर २९ येथील ओवे मैदानावर आयोजित करण्यात येणाऱ्या 'हिंद दी चादर' या ऐतिहासिक कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी आज कोकण विभागीय कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. सूर्यवंशी बोलत होते.

या बैठकीस सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) फरोग मुकादम, अपर आयुक्त (आस्थापना) मिनल कुटे, सहआयुक्त (नगरपालिका प्रशासन) विजयकुमार म्हसाळ, सहआयुक्त (करमणूक) रविंद्र पवार, पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते, पोलीस उपायुक्त (वाहतूक) तिरुपती काकडे, सहायक पोलीस आयुक्त विक्रम कदम, पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते, नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व सुनील पवार, राज्य समन्वयक तथा उपजिल्हाधिकारी रविंद्र राठोड, प्रभारी माहिती उपसंचालक मनोज सानप, प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत चव्हाण यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. तसेच ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, मुंबई ग्रामीण व मुंबई शहरचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे याबैठकीत सहभागी झाले होते.

यावेळी कार्यक्रमाची एकूण रूपरेषा, जनजागृती उपक्रम, प्रभात फेऱ्या, विद्यार्थी व युवकांचा सहभाग, मुख्य सोहळ्याचे नियोजन तसेच कायदा व सुव्यवस्था, वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता आणि आरोग्य सुविधांबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रभावी प्रचारासाठी होर्डिंग व बॅनरचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये निबंध, चित्रकला, वक्तृत्व व गायन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून 'हिंद दी चादर' विषयावरील माहितीपट, चित्रपट व गीतांचे सादरीकरण करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमस्थळी अग्निशमन विभागामार्फत फायर ऑडिट करणे, पिण्याच्या पाण्याची व इतर आवश्यक सुविधांची व्यवस्था करणे, भाविकांसाठी निवास व्यवस्था उपलब्ध करून देणे, परिसर स्वच्छ ठेवणे तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर भाविकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी वैद्यकीय सुविधा सज्ज ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

'हिंद दी चादर' कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादूर यांच्या त्याग, शौर्य आणि बलिदानाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन करत, हा कार्यक्रम सामाजिक ऐक्य, सद्भावना आणि ऐतिहासिक मूल्यांची जाणीव निर्माण करणारा ठरेल, असा विश्वास डॉ. सूर्यवंशी यांनी व्यक्त केला. तसेच कार्यक्रमाच्या आयोजनात कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी सर्व विभागांनी दक्षता, समन्वय आणि जबाबदारीने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

# सीकेटी विद्यालयात विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी माध्यमिक विभागाचा शुभेच्छा चिंतन कार्यक्रम बुधवारी (दि.११) झाला.



या कार्यक्रमास प्रमुख अतिथी नगरसेविका अस्मिता घरत त्यांनी विद्यालयाची माजी विद्यार्थिनी म्हणून मला विद्यालयाचा सार्थ अभिमान आहे, असे सांगितले तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर शुभेच्छा दिल्या.

प्राचार्य कैलास सत्रे यांनी प्रास्ताविकातून परीक्षेत प्रविष्ट होणाऱ्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेबद्दल बहुमूल्य मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. नववीच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विद्यालयातील विषयाच्या शिक्षिका हेमा रापते यांनी विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनाच्या आठवणी सांगत परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

मराठी विषय शिक्षिका स्वाती पाटील यांनी आचरण शुद्ध विद्येची जोपासना करावी तसेच संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आदर्श ठेवत भावी आयुष्यामध्ये समाजसेवेचे व्रत अंगी करावे, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमास उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे तसेच प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यमाचे प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका पारधी मॅडम, विद्यालयातील माजी शिक्षिका तनुजा मोरे, सर्व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# महापौर सहाय्यता निधीला रूचिता लोंढे देणार नगरसेवकाचे पाच वर्षांचे मानधन
### महापौर नितीन पाटील यांना दिले पत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेविका रुचिता लोंढे यांनी त्यांना नगरसेवक म्हणून मिळणारा मानधन आणि भत्ता संपूर्ण पाच वर्षासाठी महापौर सहाय्यता निधीसाठी देण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदभातील पत्र त्यांनी महापौर नितीन पाटील यांना दिले.




नुकत्याच झालेल्या पनवेल महानगरपालिकेची निवडणुकीत प्रभाग क्र १९ मधून भाजप पनवेल शहर महिला मोर्चा अध्यक्षा रुचिता लोंढे या बिनविरोध म्हणून निवडून आल्या आहे. आपल्या दुसऱ्या नगरसेवकाच्या टर्ममध्ये त्यांनी अत्यंत कौतुकास्पद निर्णय घेतला आहे. त्यांना नगरसेवक म्हणून मिळणारा मानधन आणि भत्ता संपूर्ण पाच वर्षासाठी महापौर सहाय्यता निधीसाठी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या उपक्रमाचे महापौर नितीन पाटील यांनी कौतुक करत त्यांच्या या उपक्रमामुळे इतर नगरसेवकांना चांगले काम करण्याची प्रेरणा मिळेल, असे सांगितले.

# नवी मुंबई महापालिकेमार्फत विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'हिंद–दी–चादर' श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त अत्यंत भव्य स्वरुपातील कार्यक्रम २८ ते १ मार्च २०२६ या कालावधीत सेक्टर २९ खारघर येथील ओवे मैदानात सकाळी ८ ते रात्री १० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे.



श्री गुरु तेगबहादूर साहिब यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहित व्हावा यादृष्टीने राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. श्री गुरु तेगबहादूर साहिब यांचा प्रेरणादायी वारसा जपत त्याला आधुनिक भारताच्या सुशासनाची जोड देत प्रशासन आणि नागरिक यांनी एकत्रित येऊन 'हिंद–दी–चादर' हा कार्यक्रम राबविला जात आहे.

या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापौर श्रीम. सुजाता पाटील व महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध लोकोपयोगी उपक्रम राबविले जात आहेत तसेच जगभरातून येणाऱ्या नागरिकांसाठी आवश्यक सोयीसुविधांची पूर्तता करण्यात येत आहे. अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार हे नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने समन्वयक अधिकारी असणार असून संबंधित विभागप्रमुखांकडे जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने नागरिकांचे आरोग्य आणि सक्षमीकरण हे कुटुंबांच्या, समाजाच्या तसेच संपूर्ण देशाच्या प्रगतीसाठी केंद्रस्थानी आहे हे लक्षात घेत १० ते २५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत नमुंमपा आरोग्य विभागाच्या वतीने विशेष आरोग्य अभियान राबविण्यात येत आहे.

या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेची सर्व रुग्णालये आणि नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे यांच्यामार्फत नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये २५ फेब्रुवारी पर्यंत १२४ शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात येत असून त्यामध्ये, उच्च रक्तदाब आणि मधुमेहाच्या निदानासाठीची तपासणी करणे. तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या तोंडाच्या कर्करोग निदानासाठीची तपासणी करणे, माता व बाल आरोग्य आणि लसीकरण, क्षयरोग होण्याची अतिजोखीम असलेल्या महिलांची क्षयरोग निदानासाठीची तपासणी करणे. सिकलसेल रोग (SCD) तपासणी करणेआदी तपासण्या करण्यात येत आहेत. याकरिता अनुभवी स्त्रीरोगतज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ, कान नाक व घसा रोग तज्ज्ञ, त्वचारोग तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, दंत शल्यचिकित्सक अशा तज्ज्ञांच्या सेवा दिल्या जात आहेत.

'हिंद–दी–चादर' उपक्रमाच्या अनुषंगाने आज १० फेब्रुवारी, २०२६ रोजी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांच्या नियंत्रणाखाली नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी व नेरूळ रुग्णालयात तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र वाशी आणि नेरूळ २ या ठिकाणी विशेष आरोग्य शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरांना नागरिकांचा, विशेषत्वाने महिलांचा मोठया प्रमाणात प्रतिसाद लाभला. अशा प्रकारे 'हिंद–दी–चादर' कार्यक्रमानिमित्त महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये व नागरी आरोग्य केंद्रांमध्ये २५ फेब्रुवारी पर्यंत दररोज आयोजित करण्यात येणाऱ्या आरोग्य शिबीरांचा लाभ नवी मुंबईकर नागरिकांनी मोठया संख्येने घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# गाणगापूर ते वाशिंद दत्त पादुका पालखीमध्ये नवी मुंबईकरही सहभागी

**नवी मुंबई : बातमीदार**

गाणगापूर येथून भाऊ प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली श्री दत्त पादुका पालखी परिक्रमा शुक्रवार (दि. ६ फेब्रुवारी) रोजी अत्यंत भक्तिभावात व उत्साहात मार्गस्थ झाली आहे. सद्गुरू श्री दत्तात्रेय महाराजांच्या पावन भूमीतून निघालेली ही पदयात्रा, २७ फेब्रुवारी रोजी प्रति गाणगापूर श्रीक्षेत्र दहागाव, वाशिंद (मुंबई) येथे पोहोचणार आहे.



या पदयात्रेत नवी मुंबई, ठाणे व रायगड जिल्हातील मोठ्या संख्येने दत्तभक्त व पदयात्री सहभागी झाले आहेत. टाळ–मृदंगाच्या गजरात, भजन–कीर्तन आणि दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा या जयघोषात पदयात्री दररोज अनेक किलोमीटरचा प्रवास पायी करत आहेत. संपूर्ण मार्ग भक्तिमय वातावरणाने भारून गेला असून ठिकठिकाणी भाविकांकडून पदयात्रेचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात येत आहे.

यंदा या श्री दत्त पादुका पालखी परिक्रमा सोहळ्याचे रौप्य महोत्सवी (२५ वे) वर्ष असून, या निमित्ताने मार्गावरील विविध गावांमध्ये ग्रामस्थ, सामाजिक संस्था व स्थानिक नागरिकांच्या वतीने पदयात्रेसाठी अन्नदान, पिण्याचे पाणी, चहा–नाश्ता तसेच विश्रांतीची उत्तम व्यवस्था करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी आरती, भजन व प्रवचनांचे आयोजन करण्यात येऊन दत्तभक्तांना आध्यात्मिक समाधानाचा अनुभव मिळत आहे.

पदयात्रेदरम्यान शिस्त, स्वच्छता व सामाजिक बांधिलकी यावर विशेष भर देण्यात आला आहे. मार्गावर कचरा न टाकणे, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणे, तसेच आपसी एकोपा व सहकार्याचे उत्तम उदाहरण पदयात्री देत आहेत. त्यामुळे ही पदयात्रा केवळ धार्मिक न राहता सामाजिक प्रबोधनाची चळवळ ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

दरम्यान, भाऊ प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे दत्तभक्तांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, ही पदयात्रा श्रद्धा, भक्ती व एकतेचे प्रतीक ठरत आहे.

# काळसेकर पॉलिटेक्निकचा स्टीम फेस्ट उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अंजुमन–ए–इस्लाम अब्दुल रझाक काळसेकर पॉलिटेक्निक (ARKP) येथे STEM फेस्ट २०२५–२०२६ अंतर्गत प्रथम वर्ष विभागाच्या वतीने आयोजित विज्ञान प्रदर्शन उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडले. हा कार्यक्रम ७ फेब्रुवारी २०२६ रोजी संस्थेच्या परिसरात आयोजित करण्यात आला.



या प्रदर्शनात २५ शाळांचा सहभाग असून ३५ शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एकूण १२८ विद्यार्थ्यांनी ४० नाविन्यपूर्ण आणि समस्यांवर आधारित प्रकल्प सादर केले. या प्रकल्पांमधून वैज्ञानिक संकल्पनांचा प्रत्यक्ष वापर, विश्लेषणात्मक दृष्टिकोन आणि सर्जनशीलतेचा उत्कृष्ट प्रत्यय आला, तसेच वास्तव जीवनातील समस्यांवर उपाय शोधण्याचा विद्यार्थ्यांचा गंभीर प्रयत्न अधोरेखित झाला.

संस्थेच्या प्रथम वर्षातील २२, द्वितीय वर्षातील ४ आणि तृतीय वर्षातील पाच विद्यार्थ्यांचा सहभाग विशेष उल्लेखनीय ठरला. हा कार्यक्रम प्राचार्य आरिफ शेख यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. तसेच कार्यक्रम समन्वयक वरिष्ठ व्याख्याता विजया औंढेकर आणि प्रथम वर्ष समन्वयक डॉ. फरहान मुसा यांनी यशस्वी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. प्रमुख पाहुणे डॉ. रमजान खाटिक यांनी आपल्या मनोगतात अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, चिकित्सक दृष्टी आणि नवोन्मेषाची भावना विकसित होते, असे नमूद केले.

स्पर्धेच्या शेवटी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्थांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. न्यू होरायझन पब्लिक स्कूल यांना २००१ चे प्रथम पारितोषिक, सेंट जोसेफ स्कूल यांना १५०१ चे द्वितीय पारितोषिक आणि एम.ई.एस. ग्यान मंदिर स्कूल, कळंबोली यांना १००१ चे तृतीय पारितोषिक देण्यात आले.

या संपूर्ण उपक्रमास प्राचार्य आरिफ शेख यांचे मार्गदर्शन आणि संचालक डॉ. रमजान खाटिक यांचे सहकार्य लाभले. तसेच चेअरमन, बोर्ड ऑफ इन्स्टिट्यूशन्स, नवी मुंबई बुरहान हॅरिस आणि पद्मश्री (२०२४) पुरस्कार विजेते अध्यक्ष, अंजुमन–ए–इस्लाम झहीर काझी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

सर्व प्राध्यापकांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या यशाबद्दल कौतुक व्यक्त केले. या विज्ञान प्रदर्शनामुळे संस्थेची शैक्षणिक बांधिलकी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीचा दृढ संकल्प पुन्हा अधोरेखित झाला.

# लोकसहभागातून घडणार आरोग्यदायी महाराष्ट्र

## ◆ माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव योजना राबविणार
## ◆ ७० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या गावाला बहुमान

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम व स्वयंपूर्ण करण्याच्या उद्देशाने आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या महत्वाकांक्षी माझं गाव, आरोग्य संपन्न गाव या अभियानास राज्य सरकारने मंजूरी दिली आहे. लोकसहभागावर आधारित हे राज्यव्यापी आरोग्य अभियान १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७पर्यंत राबविण्यात येणार आहे.

गाव पातळीवर नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी, प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्य सेवांना चालना देण्यासाठी, आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत बदल व आरोग्यदायी जीवनशैली रुजवण्यासाठी हे अभियान प्रभावी ठरणार असून, सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, सामाजिक प्रबोधन यासह ग्रामीण भागातील विविध घटकांच्या समन्वयाने आरोग्यदायी गाव बनवणे हे या अभियानाचे मुख्य उद्दीष्ट आहे. या अभियानांतर्गत उपचारांपेक्षा आजार होऊच नयेत याबाबतच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येणार आहे. संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, माता-बाल आरोग्य सुधारणे, पोषण, स्वच्छता, सुरक्षित पाणी, सांडपाणी व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य यांचा समावेश या मोहिमेत करण्यात आला आहे. नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे.

माझं गाव आरोग्यसंपन्न गाव योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय, विभागस्तरीय, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर समित्या स्थापना केल्या जाणार आहेत. आरोग्यमंत्र्यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती समिती असून, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, आयुक्त व संचालक या समितीचे सदस्य असतील. राज्यस्तरीय कृती समितीही स्थापन करण्यात येणार असुन, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव (अपर मुख्य सचिव) समितीचे अध्यक्ष असतील. आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार गावांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. एकूण गुणांपैकी ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून घोषित करण्यात येईल. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. अभियानासाठी सुमारे ८०.७५ कोटी रुपये निधी मंजूर करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

**माझं गाव आरोग्यसंपन्न गाव योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आरोग्य विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. हे अभियान लोकसहभागातून राबविण्यात येणार आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या अभियानात सहभाग घेउन आपले गाव व पर्यायाने आपला जिल्हा, राज्य 'आरोग्यसंपन्न' बनविण्यासाठी आपला हातभार लावूया.**
**-नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप.**

# लोहोप, चिखली प्राथमिक आरोग्य केंद्राला एनक्यूएएस प्रमाणपत्र



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील लोहोप व अलिबाग तालुक्यातील चिखली प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी नॅशनल क्वॉलिटी ॲश्युरन्स स्टँडर्स (एनक्यूएएस) अंतर्गत राज्यस्तरीय प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. विशेष म्हणजे, जिल्ह्यात सर्वाधिक ८८.३१ टक्के गुण मिळवणारे लोहोप हे पहिलेच प्राथमिक आरोग्य केंद्र ठरले आहे. तसेच, प्रथमच या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रांना एकाच वेळी राज्यस्तरीय प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या सातत्यपूर्ण सेवेचा हा गौरव झाला आहे.

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके (एनएक्यू) हा भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयांतर्गत राबविण्यात येणारा महत्त्वाचा गुणवत्ता कार्यक्रम आहे. शासकीय आरोग्य संस्थांमधील सेवेची गुणवत्ता, औषध व साधनसामग्री व्यवस्थापन, रुग्ण तपासणी व त्यांचे समाधान, स्वच्छता आदी गोष्टींचे सखोल मूल्यमापन करण्यात येते. यासंदर्भात राज्यस्तीय पथकाने लोहोप येथे सप्टेंबर २०२५मध्ये व चिखली येथे नोव्हेंबर २०२५मध्ये आरोग्य केंद्रांची पाहणी केली होती. यानंतर मंगळवारी (ता.३) निकाल जाहीर केला. या गुणवत्ता मानांकनात लोहोप व चिखली प्राथमिक आरोग्य केंद्राने अव्वल स्थान पटकावित एक आदर्श निर्माण केला आहे. हे प्रमाणपत्र संबंधित आरोग्य संस्थेतील सेवा राष्ट्रीय स्तरावरील निश्चित गुणवत्ता मानकांनुसार असल्याचे दर्शवते. हे यश केवळ गुणांचे नसून दर्जेदार, रुग्णकेंद्रित, सुरक्षित व शिस्तबद्ध आरोग्य सेवा देण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण आणि सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे.

या यशाबद्दल रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनी कौतुक केले. या यशासाठी त्यांचे नेहमीच मोलाचे सहकार्य लाभल्याचे येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नमूद केले.

तसेच जिल्हा सार्वजनिक आरोग्य परिचर्या उषा वावरे, जिल्हा एनक्यूएएस समन्वयक चित्रा गुरव व जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी रेश्मा संकपाळ यांचेही सहकार्य लाभले.

या उल्लेखनीय यशासाठी खालापूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कल्याणी इंगोले, प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोपचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मंगेश देशमुख, अलिबाग तालुका अधिकारी डॉ. अश्विनी सपकाळ, प्राथमिक आरोग्य केंद्र चिखलीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. औदुंबर कोळी, यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. या संपूर्ण गुणवत्तावृद्धी प्रक्रियेत नुकतेच त्यांचे दुःखद निधन झालेले लोहोप प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्यसेवक दिवंगत लक्ष्मीकांत भुसारे यांनी दाखवलेली कार्यनिष्ठा, समर्पण आणि सेवाभाव अविभाज्य भाग राहिला आहे. आरोग्य केंद्र लोहोपला प्राप्त झालेले हे राज्यस्तरीय प्रमाणपत्र हे त्यांना अर्पण केलेले एक सन्माननीय स्मरणचिन्ह ठरेल, अशी भावना येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.

## लाडकी बहिण लाभार्थ्यांना येत्या ३१ मार्चपर्यंत ई-केवायसी दुरूस्तीची संधी

**पोलादपूर : प्रतिनिधी**


तालुक्यातील बऱ्याच लाभार्थ्यांची ईकेवायसी चुकली आहे. त्यांना दुरुस्ती करण्यासाठी पर्याय देण्यात आला आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेंतर्गत ईकेवायसी येत्या ३१ मार्च २०२६ पर्यंत करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांनी ईकेवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे. तथापि, सदर प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थ्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित कायम कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे याबाबतचा पर्याय निवडताना नजरचुकीने चुकीचा पर्याय निवडण्यात आलेला आहे, अशा लाभार्थी महिलांसाठीच ऑनलाईनमध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी दि.३१ मार्च पर्यंत उपलब्ध करून देण्यात आलेली असुन दि.०६ फेब्रुवारी रोजी याबाबत शासननिर्णय निर्गमित करण्यात आले आहे.उपरोक्त अनुषंगाने योजनेच्या पोर्टलवर सुधारणा करण्यात आली आहे, यापुढे कोणत्याही परिस्थितीत सुधारणा करण्याची संधी दिली जाणार नाही,

# सातखणी बुरूजावर पर्यटकांची रेलचेल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा आगरकोट किल्ला इतिहासीक काळात पोतुर्गिजाचा अभेद बालेकिल्ला, आगरकोट सभोवातलची समुद्र तटबंदी आणि डोमिनिकन चर्च, फ्रांसिस्कन चर्च, चौकोनी बुरूज आणि सातखणी पहाणे पर्यटक व पै-पाहूणे यांची नेहमी गर्दी असते.



आगरकोट किल्लाच्या वावव्येकडील बुरूजाजवळील लहान दरवाजाचा आग्येस ४५.७२ मीटरवर तटबंदीच्या पश्चिमेकडील भिंतींत पडलेल्या भगदाडासमोर १५३४ च्या सुमारास बांधलेल्या फ्रांन्सिस्कन इमातीच्या मध्यभागी असलेल्या ६.०९ मीटर चौकोनी आकाराच्या सातखणीबुरूजाच्या भिंतीच्या सांगाडा पहावयास मिळतो. पुर्वी त्याची उंची २९.२६ मीटर इतकी नमुद केलेली असली तरी वरच्या बाजूने भिंती पडल्यामुळे उंची कमी झालेली आहे. बुरूजाच्या लगत भोवताली सर्व इमारती भिंती पुर्णपणे पडलेल्या असून आजूबाजूस अर्धवट भिंतीचे अवशेष दिसतात.समुद्र मार्गे शत्रुनी हल्ला केल्यास शत्रुवर करडी नजर ठेवण्यासाठी हा सातखणी बुरूजाची बांधणी झाली असावी असे म्हटले जाते.

या सातखणी बुरूजाच्या वरील बाजूकडून दुरवर समुद्र किनारी नजर जात असल्याने शत्रुच्या हालचालीवर नजर ठेवण्यास या सातखणी बुरूजाचाउपयोग केला जात असे. सध्या रेवदंडा मोठे बंदर कडे जाणाऱ्या मुख्यः रस्त्यावरून सातखणी बुरूजाकडे जाण्यासाठी मार्ग आहे. या ठिकाणी पर्यटक व पै-पाहूणे यांची नित्याची रेलचेल असते.

## नगरपरिषद रुग्णालयात आरोग्य शिबिर संपन्न

**खोपोली : प्रतिनिधी**



डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, खोपोली नगर परिषद येथे हिंद- दी-चादर कार्यक्रम अंतर्गत बाह्यरूग्ण विभागात आरोग्य शिबिर घेणेत आले.नवनिर्वाचित आरोग्य सभापती मयुरी शेलार यांचे हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करणेत आले.

यावेळी महिला बाल कल्याण सभापती सुवर्णा मोरे, शिक्षण सभापती अमितजी फाळे,सानिया शेख .स्वेला अहिर वैद्यकीय अधिकारी डॉ ठाकूर-वानखेडे, मानद डॉ रीना डॉ त्वचारोग तज्ञ, काननाक घसा तज्ञ ,सिस्टर गिरी व सर्व दवाखाना स्टाफ , आशा सेविका व रुग्ण यावेळी उपस्थित होते .

आरोग्य सभापती मयुरी शेलार यांनी सार्वजनिक आरोग्य विषयी व लवकरच खोपोलीत जनजागृती साठी डिजिटल बोर्ड तयार करणार अशी माहिती दिली व नवीन दवाखाना इमारतीची पाहणी केली व काही महत्वाच्या सुचना दिल्या.

यावेळी आरोग्य सभापती मयुरी शेलार, महिला बाल कल्याण सभापती सुवर्णा मोरे,मा. शिक्षण सभापती अमितजी फाळे यांचा सत्कार करण्यात आला.शिबिराचा लाभ १०९ शिबिरार्थीनी घेतला.

# भाजपा संस्थापक अध्यक्ष दीनदयाळ उपाध्याय यांना खोपोली भाजपने वाहिली श्रद्धांजली

**खोपोली:प्रतिनिधी**

भारतीय जनसंघाचे नेते त्याचप्रमाणे भारतीय जनता पक्षाचे संस्थापक अध्यक्ष सनातन विचारधारेचे प्रणेते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना पुण्यतिथी निमित्त खोपोली भारतीय जनता पक्षातर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आले.



यावेळी शहराध्यक्ष अजय इंगुलकर यांनी पंडितजींना श्रद्धांजली अर्पण करताना त्यांच्या संघटनात्मक कार्याचा आढावा घेतला पक्षाच्या वाढीसाठी पंडितजींनी दिलेल्या योगदानाचाही त्यांनी आपल्या भाषणात माहिती दिली.

भाजप शहर मध्यवर्ती कार्यालया त झालेल्या या अभिवादन सभेला , युवा मोर्चाचे शहराध्यक्ष अनिकेत पाटील, संजय म्हात्रे, स्नेहल सावंत, सुनीती महर्षी, सीमा मोगरे, भारती शहा, गणेश ठाकरे, संजय करंजकर, यासह इतर कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

अजय इंगुलकर यांनी पंडितजींच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केल्यानंतर उपस्थित कार्यकर्त्यांनी पुष्प वाहून अभिवादन केले

# गुरु ग्रंथ साहिब : शीख धर्माचा शाश्वत गुरु आणि मानवतेचा मार्गदर्शक



शीख धर्माचा सर्वात पवित्र आणि सर्वोच्च धर्मग्रंथ म्हणून गुरू ग्रंथ साहिब यांना अद्वितीय स्थान आहे. शीख धर्मात गुरू ग्रंथ साहिब यांना केवळ ग्रंथ मानले जात नाही, तर त्यांना जिवंत गुरूचे स्थान देण्यात आले आहे. मानवाला सत्य, समानता, सेवा आणि ईश्वरभक्तीचा मार्ग दाखवणारा हा ग्रंथ संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे.

गुरू ग्रंथ साहिब यांचे संकलन शीख धर्माचे पाचवे गुरू, श्री गुरु अर्जन देवजी यांनी सन १६०४ मध्ये केले. सुरुवातीला या ग्रंथाला 'आदि ग्रंथ' असे संबोधले जात होते. नंतर शीख धर्माचे दहावे गुरू, श्री गुरु गोबिंद सिंगजी यांनी नववे गुरु श्री गुरु तेग बहादुरजी यांच्या वाणीचा समावेश करून या ग्रंथाला अंतिम स्वरूप दिले. सन १७०८ मध्ये गुरू गोबिंद सिंगजी यांनी गुरू ग्रंथ साहिब यांना शीख धर्माचा अंतिम आणि शाश्वत गुरू घोषित केले. त्यानंतर शीख धर्मात कोणताही मानवी गुरू झाला नाही.

गुरू ग्रंथ साहिब हे गुरुमुखी लिपीत लिहिलेले असून त्यात एकूण १४३० अंग (पाने) आहेत. या ग्रंथामध्ये शीख गुरूंच्या वाणीसोबतच संत कबीर, संत नामदेव, संत रविदास, संत शेख फरीद यांसारख्या विविध संतांची शिकवण समाविष्ट आहे. यावरून शीख धर्म हा सर्व धर्मांचा आदर करणारा आणि मानवतेचा संदेश देणारा धर्म असल्याचे स्पष्ट होते. गुरू ग्रंथ साहिबची रचना ३१ रागांमध्ये करण्यात आली असून त्यातील वाणी ही संगीतबद्ध स्वरूपात आहे.

गुरू ग्रंथ साहिबचा मुख्य संदेश म्हणजे 'इक ओंकार' - देव एकच आहे. सर्व मानव समान आहेत आणि जात, धर्म, पंथ किंवा वर्ण यांच्या आधारे कोणताही भेदभाव करू नये, हा या ग्रंथाचा मूलभूत विचार आहे. प्रामाणिकपणे काम करणे (किरत करो), देवाचे स्मरण करणे (नाम जपो) आणि गरजूंना मदत करणे (वंड छको) ही जीवनाची तीन मुख्य तत्त्वे गुरू ग्रंथ साहिबमध्ये सांगितली आहेत. या शिकवणीमुळे मानवाला नैतिक, प्रामाणिक आणि सेवाभावी जीवन जगण्याची प्रेरणा मिळते.

शीख धर्मात गुरू ग्रंथ साहिब यांना गुरूद्वारामध्ये अत्यंत आदराने ठेवले जाते. दररोज सकाळी 'प्रकाश' विधी करून ग्रंथ उघडला जातो आणि रात्री 'सुखासन' विधी करून आदरपूर्वक ठेवला जातो. गुरूद्वारात प्रवेश करताना डोक्यावर रुमाल किंवा पगडी बांधूनच प्रवेश केला जातो, यावरून या ग्रंथाबद्दल असलेला सन्मान आणि श्रद्धा दिसून येते.

गुरू ग्रंथ साहिब हा केवळ शीख धर्माचा ग्रंथ नसून तो संपूर्ण मानवजातीसाठी शांती, प्रेम, समानता आणि बंधुभावाचा संदेश देणारा मार्गदर्शक आहे. या ग्रंथातील शिकवण आजच्या आधुनिक युगातही तितकीच महत्त्वपूर्ण आहे. मानवतेचा संदेश देणारा, सत्याचा मार्ग दाखवणारा आणि जीवनाला योग्य दिशा देणारा गुरू ग्रंथ साहिब हा खऱ्या अर्थाने मानवजातीचा आध्यात्मिक दीपस्तंभ आहे.

**-प्रविण डोंगरदिवे,**
**उपसंपादक ,विभागीय माहिती कार्यालय,**
**कोंकण भवन, नवी मुंबई**


# राज्यातील कार्यरत शिक्षकांना टीईटी परीक्षेत गुणाची सवलत द्या -राज्याध्यक्ष राजेश सुर्वे

**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाच्या वतीने नंदकुमार बेडसे सो. अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांची शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली भेट घेण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना दोन वर्षात शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक केल्यानंतर. राज्यात शिक्षक संवर्गातून पदोन्नतीने पदे भरण्याच्या प्रक्रियेत शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे.

राज्यातील पहिली ते आठवीच्या वर्गाला अध्यापन करणाऱ्या शासकीय निमशासकीय असंख्य शिक्षकांना टीईटी, सिटीईटी परीक्षा दोन वर्षात उत्तीर्ण होणे बंधनकारक केली आहे. राज्यातील पहिली ते आठवीच्या वर्गाला अध्यापन करणारे अनेक सेवाजेष्ठ शिक्षक पदोन्नतीसाठी पात्र आहेत अशा सेवाजेष्ठ शिक्षकांना पदोन्नतीने पदोन्नती मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, केंद्र समन्वय, विस्तार अधिकारी, वीषय शिक्षक पदांना सीटीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.




राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी शिक्षण संस्थातील शिक्षक भरतीसाठी पवित्र प्रणालीमार्फत शिक्षक पात्रता परीक्षा सीटीईटी टीईटी घेण्यात येते. सदर परीक्षा उत्तीर्ण होण्याकरता अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, विमुक्त व भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व दिव्यांग यांच्यासाठी पाच टक्के गुणाची सवलत म्हणजेच उत्तीर्ण होण्यासाठी ५५% गुण असणे आवश्यक आहे तसेच माजी सैनिक, शहीद सैनिकाच्या पत्नी व त्यांचे कुटुंबीय यांना १५ टक्के गुणाची सवलत देण्यात येते म्हणजेच उत्तीर्ण होण्यासाठी ४५ टक्के गुणाची आवश्यकता आहे.

याप्रमाणेच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी शिक्षण संस्था मधील ज्या शिक्षकांचे सेवा १५ वर्षे व त्यापेक्षा जास्त सेवा झालेली आहे अशा सेवा जेष्ठ शिक्षकांच्या वयाचा, मानसिकतेचा, अभ्यासक्रमाचा विचार करून उत्तीर्ण होण्यास १५ टक्के गुणाची सवलत देण्यात यावी म्हणजे सीटीईटी, टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्यास किमान ४५ टक्के गुण करण्यात यावी अशी सवलत दिल्यास कार्यरत शिक्षकांना ही परीक्षा उत्तीर्ण करू शकतील. या संदर्भात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणेचे अध्यक्ष बेडसे साहेब (भाप्रसे) यांच्या समवेत चर्चा झाली असून त्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.

# श्रीलंकेचा ओमानवर १०५ धावांनी दणदणीत विजय

## शनाका-रत्नायके ठरले विजयाचे हिरो

**मुंबई : प्रतिनिधी**

श्रीलंका संघाने टी-२० विश्वचषक २०२६ मधील आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय मिळवत ओमानला पराभूत केलं आहे. श्रीलंका व ओमान यांच्यात टी-२० विश्वचषक २०२६ मधील पल्लेकले येथे सामना खेळवला गेला. या सामन्यात श्रीलंकेने ओमानवर १०५ धावांनी सर्वात मोठा विजय नोंदवला. श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत २२५ धावा केल्या. तर प्रत्युत्तरात ओमानचा संघ २० षटकांत ९ बाद १२० धावाच करू शकला.




श्रीलंकेचा हा टी-२० विश्वचषक २०२६ मधील हा सलग दुसरा विजय आहे. ओमानवर श्रीलंकेने १०५ धावांनी मोठा विजय नोंदवल्यानंतर संघाला गुणतालिकेत नेट रन रेटमध्येदेखील मोठा फायदा होणार आहे. याशिवाय सलग दोन सामने जिंकत संघाने सुपर-८ चा मार्ग सुकर केला आहे. तर ओमान संघाला सलग दुसरा पराभव पत्करावा लागला आहे. त्यामुळे सुपर-८ चं त्यांचं स्वप्न धुळीस मिळालं आहे.

श्रीलंकेने दिलेल्या २२६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ओमानची सुरूवात खूप खराब झाली. संघाचा कर्णधार व स्फोटक फलंदाज जतिंदर सिंग १ धाव करत बाद झाला. वसीम अलीने २७ धावांची खेळी केली. तर मोहम्मद नदीमने अर्धशतकी खेळी केली. याशिवाय ओमानचे सर्व फलंदाज श्रीलंकेच्या गोलंदाजीसमोर फेल झाले. मोहम्मद नदीम शेवटपर्यंत नाबाद राहत त्याने संघासाठी ५६ चेंडूत ३ चौकार व एका षटकारासह ५३ धावांची खेळी केली. नदीमचं हे आंतरराष्ट्रीय इतिहासातील पहिलं अर्धशतक होतं. श्रीलंकेकडून चमीरा व तीक्ष्णा यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या. तर वेलाल्गे, मेंडिस, व दुशान हेमंता यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या.

**श्रीलंकेची वादळी फटकेबाजी**

श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना धावांचा डोंगर उभारला. ओमानने गोलंदाजीला सुरूवात चांगली केली, पण रत्नायके,कुसल मेंडिस व दासुन शनाका यांनी वादळी फलंदाजी केली. श्रीलंकेचे दोन्ही सलामीवीर लवकर बाद होत माघारी परतले. यानंतर पवन रत्नायकेने २८ चेंडूत ८ चौकार व एका षटकारासह ६० धावांची उत्कृष्ट खेळी केली. तर दासुन शनाकाने १९ चेंडूत विक्रमी अर्धशतकी खेळी केली, तर २० चेंडूत त्याने २ चौकार व ५ षटकारांसह ५० धावा केल्या. तर कुसल मेंडिसने एका टोकाकडून मैदानावर राहत ४५ चेंडूत ७ चौकारांसह ६१धावा करत संघाचा डाव सावरला होता. तर कुसल मेंडिसने १९ धावांची झटपट खेळी करत २२५ धावा केल्या.

# पाकिस्तानने अखेर गुडघे टेकल्याने आयसीसीचे मोठे नुकसान टळले

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान संघांतील लढत वेळापत्रकानुसार होणार असल्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) १७४ मिलिअन डॉलरचे प्रचंड नुकसान टळले आहे. प्रक्षेपण हक्क, गेटमनी आणि अन्य प्रायोजक यांच्या माध्यमातून एवढा पैसा उभे राहणे अपेक्षित आहे.




पाकिस्तानने आठवडाभर आधी भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला होता. पाकिस्तानच्या सरकारने क्रिकेट बोर्डाला अशी सूचना केली होती. या निर्णयामुळे आयसीसी तसेच प्रक्षेपणकर्त्या कंपनीचे मोठे नुकसान होणार होते. पाकिस्तानने भूमिकेत बदल करावा यासाठी आठवडाभर वाटाघाटी झाल्या. आयसीसीचे एक पथक पाकिस्तानात दाखल झाले. त्यांनी पीसीबीचे अध्यक्ष मोहसीन नक्वी यांची भेट घेतली. बांगलादेशचे क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष अमिनुल इस्लाम हेही इस्लामाबादमध्ये होते. चर्चेच्या अनेक फेऱ्या पार पडल्या. श्रीलंका क्रिकेट बोर्डानेही पाकिस्तानला ही लढत खेळावी अशी विनंती केली होती. युएईनेही भारताविरुद्धची लढत खेळावी, असे आवाहन केले होते.

भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार घातल्यास पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे मोठे आर्थिक नुकसान होणार होते तसेच भविष्यात आयसीसीच्या स्पर्धेच्या आयोजनाची संधीही मिळाली नसती. याव्यतिरिक्त पाकिस्तान सुपर लीगमध्ये खेळणाऱ्या विदेशी खेळाडूंना एनओसी अर्थात ना हरकत प्रमाणपत्रही मिळणे कठीण झाले असते. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने या सगळ्या गोष्टींचा विचार करून भारताविरुद्धच्या सामन्यावरचा बहिष्कार मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पाकिस्तानसह आयसीसीचेही मोठे नुकसान टळले आहे.

# ऑस्ट्रेलियाने आयर्लंडला गुंडाळले

**कोलंबो : वृत्तसंस्था**

स्टोईनिस, रेनशॉ, जोश इंग्लिसची आक्रमक फटकेबाजी व एलिस-झाम्पा यांच्या भेदक माऱ्याच्या बळावर ऑस्ट्रेलियाने येथील आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या साखळी सामन्यात तुलनेने दुबळ्या आयर्लंड संघाचा ६७ धावांनी धुव्वा उडवला. आर. प्रेमदासा स्टेडियमवर रंगलेल्या या लढतीत ऑस्ट्रेलियाने २० षटकांत सहा बाद १८२ धावांपर्यंत मजल मारली होती. प्रत्युत्तरात आयर्लंडचा डाव १६.५ षटकात सर्वबाद ११५ धावांमध्ये आटोपला.

कर्णधार मिचेल मार्श मैदानात नसतानाही ऑस्ट्रेलियन संघाने सर्वच आघाड्यांवर वर्चस्व गाजवत एकतर्फी विजय नोंदवला. प्रथम फलंदाजीचे आमंत्रण मिळाल्यावर ऑस्ट्रेलियाने जोरदार फलंदाजी साकारली. मार्कस स्टोईनिसने २९ चेंडूत आक्रमक ४५ धावांची खेळी केली. त्याला जोश इंग्लिस (१७ चेंडूत ३७) व मॅट रेनशॉ (३३ चेंडूत ३७) यांनी मोलाची साथ दिली.




१८३ धावांच्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना आयर्लंडची सुरुवात अत्यंत खराब झाली. क्षेत्ररक्षण करताना झालेल्या दुखापतीमुळे कर्णधार पॉल स्टर्लिंग पहिल्याच चेंडूवर 'रिटायर्ड हर्ट' होऊन तंबूत परतला. त्यानंतर नॅथन एलिसने आपल्या भेदक माऱ्याने आयर्लंडला सावरण्याची संधीच दिली नाही. त्याने पॉवरप्लेमध्येच तीन बळी घेत आयर्लंडला लागापाठ धक्के देण्यात काहीच कसर सोडली नाही. हॅरी टेक्टर (०) आणि रॉस डायर (१२) स्वस्तात बाद झाले.

एलिसने चार षटकांत१२ धावांच्या बदल्यात चार बळी टिपले. याशिवाय झॅम्पानेही २३ धावांच्या मोबदल्यात चार बळी घेत आपल्या टी-२० कारकिर्दीतील तिसरी सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. आयर्लंडचा डाव १६.५ षटकांत अवघ्या ११५ धावांत संपुष्टात आला.

# भारत-नामिबिया सामन्याआधी अचानक या खेळाडूची एन्ट्री

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी टी २०i वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेत टीम इंडिया आपल्या दुसऱ्या सामन्यात नवख्या नामिबिया विरुद्ध खेळणार आहे. हा सामना १२ फेब्रुवारीला नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियममध्ये होणार आहे. दोन्ही संघांची आमनेसामने येण्याची ही दुसरीच वेळ असणार आहे. या सामन्यासाठी भारतीय चाहत्यांमध्ये उत्साहाचं वातावरण पाहायला मिळत आहे. तर दुसऱ्या बाजूला यूएई टीममध्ये मोठा बदल झाला आहे. आयसीसीने यूएई टीममधील बदली खेळाडूची घोषणा केली आहे.

यूएई क्रिकेट टीममध्ये मोहम्मद जोहेब याच्या जागी हैदर शाह याचा समावेश करण्यात आहे.



## आयसीसीची घोषणा

आयसीसीच्या तांत्रिक समितीकडून या बदलासाठी परवानगी देण्यात आली. त्यानंतर आयसीसीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे याबाबतची माहिती दिली आहे. नियमांनुसार, ठराविक मुदतीनंतर वर्ल्ड कप स्पर्धेसाठी संघात बदल करण्यासाठी आयसीसीच्या तांत्रिक समितीची परवानगी घ्यावी लागते. आयसीसीकडून वर्ल्ड कप स्पर्धेसाठी संघ जाहीर करण्यासह बदलासाठी ठराविक मुदत दिली जाते. मुदतीनंतर काहीही बदल करण्यासाठी आयसीसीची पूर्वपरवानगी बंधनकारक असते.

दरम्यान यूएई टी २०i वर्ल्ड कप स्पर्धेच्या दहाव्या पर्वात विजयी सुरुवात करण्यात अपयशी ठरली. यूएईचा डी ग्रुपमध्ये समावेश करण्यात आला आहे. यूएईला आपल्या मोहिमेतील पहिल्याच सामन्यात न्यूझीलंडकडून १० विकेट्सने पराभूत व्हावं लागलं. डी ग्रुपमध्ये यूएई आणि न्यूझीलंड व्यतिरिक्त दक्षिण आफ्रिका, अफगाणिस्तान आणि कॅनडाचा समावेश आहे. यूएई या मोहिमेतील आपला दुसरा सामना हा कॅनडा विरुद्ध १३ फेब्रुवारीला खेळणार आहे.

# पनवेलच्या बॉक्सरला राष्ट्रीय सुवर्णपदक

**पनवेल : वार्ताहर**

आपल्या पनवेलची मुलगी दुर्पता तारासिंह साउद ऊर्फ छोटी हिने बंगळुरू येथे पार पडलेल्या ६९ राष्ट्रीय बॉक्सिंग शालेय स्पर्धामध्ये उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून सुवर्णपदक मिळवून महाराष्ट्र आणि पनवेलचा मान वाढवला.

तिने सुरवातीच्या लढति मध्ये तेलंगाना आणि केरळ चा बॉक्सर पाहिल्याचं फेरीत हरवून क्वार्टर फाइनल मध्ये हरियाणा ची बलाढ्य खेळाडू किरण हिला एकतर्फी हरवून सेमी फायनल मध्ये कर्नाटक ला हरवून अंतिम फेरी मध्ये झारखंड च्या पूर्व राष्ट्रीय विजेती वर तूफान आक्रमक खेळी खेळून पराभूत केलं आणि राष्ट्रीय सुवर्ण पदक जिंकले.

दुर्पता ही के वी कन्या शाळेची विद्यार्थिनी आहे. तिचे प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर यानी आनंद व्यक्त केला व दुर्पता ला नंतर उच्चतम प्रशिक्षक भारताचे माजी ऑलिंपियन अर्जुन पुरस्कार प्राप्त मनोज पिंगळे व सातारा निवासी अंतरराष्ट्रीय कोच सागर जगताप यांचे मार्गदर्शन मिळाले.




# राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत मनमाडचा डंका

## सुवर्णपदकासह तीन पदकांची कमाई

**नाशिक : प्रतिनिधी**

उत्तर प्रदेशातील मोदी नगरात नाशिक जिल्ह्यातील मनमाडच्या खेळाडुंनी आपल्या कामगिरीचा डंका वाजविला आहे. मनमाडच्या खेळाडुंकडून अपेक्षेप्रमाणे कामगिरी झाली आहे. मोदी नगर येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये मनमाडचे खेळाडू चांगली कामगिरी करतील, असा विश्वास प्रशिक्षक आणि व्यवस्थापकांनी केला होता. त्याप्रमाणे मनमाडच्या खेळाडुंनी





एक सुवर्णपदक, रौप्यपदक आणि कांस्यपदकाची नोंद केली आहे.

महाराष्ट्रात वेटलिफ्टिंग या क्रीडा प्रकारात आपला दबदबा निर्माण करणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील मनमाडने पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर आपल्या कामगिरीचा ठसा उमटविला आहे. उत्तर प्रदेशातील मोदीनगर येथे ४ ते १४ फेब्रुवारी या कालावधीत राष्ट्रीय युथ ज्युनिअर आणि सिनिअर वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप सुरु आहे. या स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या महाराष्ट्राच्या संघात मनमाडच्या सहा खेळाडुंचा समावेश आहे. त्यात आतरराष्ट्रीय खेळाडू साईराज परदेशी, आकांक्षा व्यवहारे, राष्ट्रीय पदक विजेते कृष्णा व्यवहारे, आनंदी सांगळे, साहिल जाधव, श्रावणी पुरंदरे यांचा समावेश आहे. भारतातील विविध राज्यातील ५५० खेळाडू पुरुषांच्या आठ आणि महिलांच्या आठ विविध वजनी व वयोगटात सहभागी झाले आहेत.

# टी-२० विश्वचषक : वर्ल्डकपमध्ये विंडीजची इंग्लंडवर मात

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत वेस्ट इंडिजने इंग्लंडचा ३० धावांनी पराभव करत दिमाखदार विजय नोंदवला. शेरफेन रुदरफोर्डचे नाबाद अर्धशतक आणि गुडाकेश मोतीच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर विंडीजने १९६ धावांचे रक्षण करत इंग्लंडला १६६ धावांत गुंडाळले.

प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजची सुरुवात अत्यंत खराब झाली होती. सलामीवीर शाई होप आणि ब्रँडन किंग स्वस्तात बाद झाल्याने विंडीजची दोन बाद ८ अशी अवस्था बिकट झाली होती, मात्र शेरफेन रुदरफोर्डने ४२ चेंडूंत सात षटकारांच्या मदतीने नाबाद ७६ धावांची झंझावाती खेळी केली. त्याला जेसन होल्डरने (३३ धावा, १७ चेंडू) मोलाची साथ दिल्याने वेस्ट इंडिजने २० षटकांत सहा बाद १९६ धावांचा डोंगर उभा केला. इंग्लंडकडून आदिल रशीद आणि जेमी ओव्हरटनने २-२ बळी घेतले.



फिल सॉल्टने (३०) आक्रमक सुरुवात केली खरी, पण वेस्ट इंडिजच्या फिरकीपटूंनी सामन्यावर पकड मिळवली. गुडाकेश मोतीने ३३ धावांत तीन महत्त्वाचे बळी घेत इंग्लंडच्या मधल्या फळीचा कणा मोडला. रोस्टन चेसने दोन बळी घेत त्याला उत्तम साथ दिली. इंग्लंडकडून सॅम करनने सर्वाधिक नाबाद ४३ धावा केल्या, मात्र तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. १९व्या षटकात १६६ धावांवर इंग्लंडचा संपूर्ण संघ बाद झाला.

**१० वर्षानंतर विजय**

२०१६च्या वर्ल्डकप फायनलमध्ये वेस्ट इंडिजने इंग्लंडचा चार विकेटने पराभव केला होता. त्यानंतर १० वर्षांमध्ये वेस्ट इंडिजला इंग्लंडवर विजय मिळवता आला नव्हता, मात्र विजयाचा दुष्काळ वेस्ट इंडिजनं मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर संपवला आहे. इंग्लंडचा टी-२० वर्ल्ड कपमध्ये ३० धावांनी पराभव झाला, तर वेस्ट इंडिजचा हा सलग दुसरा विजय ठरला.

# सचिन तेंडुलकरकडून मुलाच्या लग्नाचे पंतप्रधान मोदींना आमंत्रण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर याचा मुलगा अर्जुन याचे लग्न ठरले आहे. त्याने मंगळवारी सर्व कुटूंबासह दिल्ली येथील उपस्थित राहून लग्नाचे आमंत्रण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले. पीएम मोदी यांच्यासोबतचा फोटो सचिनने आपल्या एक्स हँडलवरुन पोस्ट केला आहे तसेच या वेळी अर्जुन व त्याची वाग्दध वधू सानिया यांनीही मोदींसोबत फोटो काढला आहे.

या भेटीवेळी सचिन, त्याची पत्नी अंजली, मुलगी सारा, मुलगा अर्जुन आणि होणारी सून सानिया चांडोक या सर्वांनी मिळून पंतप्रधान मोदींची भेट घेतली. सचिनने या भेटीचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. त्याने लिहिले की, आम्हाला अर्जुन आणि सानियाच्या लग्नासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींना आमंत्रित करण्याचे सौभाग्य मिळाले. या तरुण जोडप्याला दिलेल्या आशीर्वादाबद्दल आणि मार्गदर्शनाबद्दल मोदीजींचे आभार.

दरम्यान, सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन आणि त्याची मैत्रीण सानिया चांडोक यांचा विवाह सोहळा ५ मार्च रोजी मुंबईत पार पडणार आहे. सानिया ही मुंबईतील प्रसिद्ध उद्योजक आणि ग्रॅव्हिस ग्रुपचे अध्यक्ष रवी घई यांची नात आहे तसेच सानिका स्वतः एक यशस्वी उद्योजक असून पेट केअर व्यवसायात सक्रिय आहे.



# क्विंटन डी कॉकने टाकले डिव्हिलियर्सला मागे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेचा सलामीवीर क्विंटन डी कॉक याने अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत कडक अर्धशतक झळकावले. या सामन्यातील ५९ धावांच्या दमदार खेळीच्या जोरावर त्याने दिग्गज क्रिकेटर एबी डिव्हिलियर्सचा मागे टाकले आहे.

दक्षिण आफ्रिकेच्या संघाकडून टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत सर्वाधिक धावांचा विक्रम आधी एबी डिव्हिलियर्सच्या नावे होते. एबीने आपल्या टी-२० कारकिर्दीत आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत २९ डावात ७१७ धावा केल्याचा रेकॉर्ड आहे. १० वर्षे अबाधित असलेला हा पराक्रम आता डी कॉकने मागे टाकला आहे. दक्षिण आफ्रिकेच्या विकेट किपर बॅटरने २९ डावात ७३७ धावा आपल्या नावे केले आहे.

टी-२० वर्ल्डकपच्या इतिहासात सर्वाधिक धावा करण्याचा विश्वविक्रम अजूनही किंग कोहलीच्या नावे आहे. २०२४च्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेनंतर आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेल्या विराट कोहलीने आपल्या टी-२० कारकिर्दीत वर्ल्डकप स्पर्धेत १२९२ धावा केल्या आहेत.

# क्रिकेट प्रेमींच्या जीवाशी खेळ

## उरलेले कोल्ड्रिंक पुन्हा बाटल्यात भरल्याचा व्हिडिओ व्हायरल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंका यांच्या यजमानपदाखाली सध्या आयसीसी टी२० विश्वचषकाची स्पर्धा सुरू आहे, मात्र दिल्लीतील अरूण जेटली स्टेडियमवर एक संतापजनक प्रकार समोर आला असून, याचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. स्टेडियममधील खाद्यपदार्थ आणि पेये विक्री करणाऱ्या केंद्रावर उरलेले शीतपेय पुन्हा बाटल्यांमध्ये भरून विकले जात असल्याचा खळबळजनक आरोप एका प्रेक्षकाने केला आहे.

१० फेब्रुवारी रोजी अरुण जेटली स्टेडियमवर नेदरलँड विरुद्ध नामिबिया हा सामना पार पडला. सामना संपल्यानंतर स्टेडियमबाहेर पडत असताना एका प्रेक्षकाला अत्यंत घाणेरडा प्रकार दिसला. स्टेडियममधील काही कर्मचारी प्रेक्षकांनी अर्धवट सोडून दिलेले किंवा उरलेले थम्स अप गोळा करत होते. हे उरलेले शीतपेय एका मोठ्या कॅरेटमध्ये जमा करून पुन्हा प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये भरले जात होते.




सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये कर्मचारी उरलेले कोल्ड्रिंक पुन्हा बाटल्यांमध्ये भरताना स्पष्ट दिसत आहेत. व्हिडिओ बनवणाऱ्या व्यक्तीने म्हटले की, अरुण जेटली स्टेडियममध्ये थम्स अपच्या उरलेल्या बाटल्या पुन्हा भरल्या जात आहेत. पुढच्या सामन्यात या जुन्याच बाटल्या पुन्हा विकल्या जातील. हा सरळ सरळ स्कॅम सुरू आहे.

हा प्रकार उघडकीस आल्यानंतर ११ आणि १२ फेब्रुवारी दरम्यान सोशल मीडियावर तक्रारींचा ओघ सुरू झाला आहे. नेटकऱ्यांनी याला निष्काळजीपणा आणि आरोग्याशी खेळ असल्याचे म्हटले आहे. उरलेले शीतपेय पुन्हा भरल्यामुळे त्यात लाळ मिसळली गेली असेल आणि संसर्गजन्य रोग पसरण्याचा मोठा धोका आहे. दिल्ली जिल्हा क्रिकेट असोसिएशन आणि कोका-कोला इंडिया यांनी यावर तात्काळ चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी नेटकऱ्यांकडून होत आहे.

**प्रशासनाकडून स्पष्टीकरणाची प्रतीक्षा**

वर्ल्ड कपसारख्या मोठ्या स्पर्धेत अशा प्रकारचा अस्वच्छतेचा आणि फसवणुकीचा प्रकार समोर आल्याने स्टेडियमच्या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. अद्याप डीडीसीए किंवा अधिकृत कंपन्यांनी यावर अधिकृत स्पष्टीकरण दिलेले नाही. मात्र, या व्हिडिओमुळे क्रिकेट प्रेमींमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. —**मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com